# साईलीला

[illegible] शिरडीचे अधिकृत मासिक



श्री साईबाबा दररोज स्वतः माधुकरी मागत असत व त्यांना माधुकरी वाढण्यात शिरडी निवासी स्वतःला धन्य समजत.

**श्री साईनाथ वाचनालय**

**श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.**

मार्च १९८२ ] [ किंमत एक रुपया

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे** एम. ए. पी. एच. डी. (इंग्रजी आवृत्ती)

**श्री.सदानंद चेंदवणकर** (मराठी आवृत्ती)

## श्रीसाई वाक्सुधा

र्ष ६१ वे) किंमत १ रुपया (अंक १२

मार्च १९८३

खास उदी विशेषांक

दूरध्वनी ८८२२५६१

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

धन्य धन्य सत्संगती ।
काय वर्णावी तिची महती ।
तिथे पासाव विवेक विरक्ति ।
परमशांति सद्भक्तां ॥ १४ ॥

साई केवळ चैतन्य मूर्ती ।
अव्यक्तचि ते आले व्यक्तीं ।
काय त्यांची निर्विषास्थिति ।
कोण निश्चितीं वानील ॥ १५ ॥

भक्त भावार्थी श्रोते प्रेमळ ।
तयालागीं तोचि कनवाळ ।
प्रेमें वदे निजचरित रसाळ ।
केवळ जें राऊळ तयांचे ॥ १६ ॥

शिरीं ज्याचा पडतो कर ।
अहंभावाचा होई चूर ।
सोऽहंभावाचा चाले गजर ।
आनंद निर्भर हृदयस्थात ॥ १७ ॥

काय मज पामरा शक्ति ।
वानावया तयांची कीर्ति ।
ज्याचा तोच भक्त प्रीतीं ।
प्रकटवी पोथी कृपेनें ॥ १८ ॥

—श्रीसाई सच्चरित अध्याय ५० वा.

## जीवनाचा रथ

**आत्मानं रथनं विद्धी**
**शरीरं रथमेव तु ।**
**बुद्धिं तु सारथिं विद्धि**
**मनः प्रग्रहमेव च ॥**

—कठोपनिषद् १-२-३


आत्मा म्हणजे रथात बसलेला
प्रवासी असे समज.
शरीर म्हणजे रथ,
बुद्धीला मात्र सारथि म्हणून जाण,
आणि मन म्हणजे
( या रथाचे ) लगाम.

# अनुक्रमणिका मार्च १९८३


१) संपादकीय — श्री साईची उदी
२) उदी नव्हे संजीवनी — श्री. पां. वा. भुतकर
३) उदी हेच औषध — कु. संजय गोवेकर
४) नेलूरचे साईसमाजाचे अधिवेशन — —
५) श्री साईलीला ९ वे लेखक-कवी संमेलन — साईनंद
६) मद्रासला बाबांच्या पादुकांचे स्वागत —
७) प्रगटे मस्जिदमें साई भगवान —
८) बाबांच्या उदीचे अनुभव — श्री. बळवंत वर्तक
९) श्री बाबांची विभूती — कु. माया ओ. बी.
१०) बाबांची उदी-महान औषध — श्री. सतीश रेगे
११) साईबाबांचा कृपाप्रसाद — सौ. गानला
१२) तू माझा त्राता — श्री. शंकर इनामदार
१३) बाबांची उदी व आनंदबाबांचे कार्य — डॉ. अ. का. पाठक
१४) शरणागतांचा आधार — श्री. रमेश आवाडे
१५) उदीचा ताजा अनुभव — श्री. सूर्यकांत दळवी
१६) श्रीसाई कृपा — सौ. पुष्पा य. काशीकर
१७) मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर —
१८) उदीचा चमत्कार — सौ. सुलभा गणेश प्रधान
१९) पूजा साई चरण होईल दुःख हरण — सुशिलाबाई निंबाळकर
२०) प्रेमानंदाच्या लहरीवर मन माझे झुले — श्री. रमाकांत पंडित
२१) जेथे जातो तेथे तू माझा सांगाती — सौ. मीनाक्षी राजुरकर
२२) मला आलेला साईकृपेचा अनुभव — सुजाता शामसुंदर पालकर
२३) श्री साईकृपा — सौ. सुशिला धोपेश्वरकर
२४) साईलीलेच्या संमेलनाला चाललो आम्ही शिर्डीला — श्री. मधुकर अंबाडे
२५) साई महिमा — श्री. शांताराम ब्रीद
२६) साई — श्री. शाम तेंडोलकर
२७) शरण तुला साईनाथा — सौ. विनीता केंकरे
२८) उदी नोहे भस्म — श्री. राधाकृष्ण गुप्ता
२९) साईची उदी जशी ही पुण्याईची नदी — श्री. शांताराम नांदगांवकर
३०) घोषणा —

# श्रीसाईंची उदी—जगातला महान चमत्कार

देहाच्या कल्याणा संतांच्या विभूति
देह कष्टविती उपकारें ॥




याप्रमाणे संत लोक काय किंवा दिव्य अवतारी व्यक्ती काय त्यांचा जन्म कसा, त्या या पृथ्वीतलावर कशा काय आल्या यांचे गूढ रहस्य महाराष्ट्रात कुठेही उपलब्ध नाही. भारतात विशेषतः महाराष्ट्रात आजतागायत कित्येक संतश्रेष्ठ; दैवी अवतारी व्यक्ती होऊन गेल्या. त्यांनी जगाचा उद्धार केला; मानवी सुखदुःखे अगदी जवळून पाहून त्याचे निराकरण केले आणि सामान्य मनुष्याला अगदी ईश्वराप्रत नेण्याचा अगदी सोपा मार्ग दाखवून दिला. तो म्हणजे ' नामःस्मरण. ' मनापासून घेतलेल्या नामःस्मरणाने मनुष्य ईश्वराप्रत जाऊन त्याचा परमभक्त होऊ शकतो आणि संसारात येणाऱ्या दुःखांचे परिमार्जन तो अगदी सहजरित्या करू शकतो.

संसार म्हटला म्हणजे सुखाप्रमाणे दुःखेही येणारच; परंतु तशा परिस्थितीतही परमेश्वराच्या नामःस्मरणाचा आधार घेऊन टिकाव धरता येतो. दुखी असणाऱ्या माणसाला दुःखे येतच नाहीत असे आपण म्हणू शकत नाही. तर त्या दुःखातून मार्ग काढण्यासाठी मनःशांतीसाठी आपल्याला कोणाची तरी जरूर लागते. त्यावेळी आपल्याला कोणाचे तरी मार्गदर्शन पाहिजे असते, आणि ते मार्गदर्शन परमेश्वराच्या नामःस्मरणामुळे मिळते. नामस्मरणाने मनःशांती मिळते; थोडावेळ का होईना पण आपल्याला दुःखाचा विसर पडतो. परमेश्वराची रुपे अनंत आहेत. प्रत्येकजण आप-आपल्या परीने परमेश्वराप्रत जाण्याचा प्रयत्न करत असतो.

विसाव्या शतकात गूढ व अतर्क्य असे श्रीसाईबाबा हे संत सिद्धयोगी अवतारी महात्म्ये होते. त्यांचा उदो उदो सर्व महाराष्ट्रात चालत आलेला आहे.

श्री भगवान साई शिर्डी ग्रामी भक्तांना संकटातून सोडविण्यासाठी सगूण रूप धारण करून आले. त्या साईमाऊलीला ओळखण्यासाठी भक्ताचे शुद्ध प्रेम असावे लागते. भक्तांनी अंतःकरणापासून गाईलेल्या गोड गळ्याने हा साईभगवान आनंदाने डोलू लागतो; भक्तजन आपले सर्वस्व ह्या प्रभूपदांवर समर्पण करतात; कोणत्याही गोष्टींची

अडचणींची तमा न बाळगता! कारण भक्तांच्या कोणत्याही प्रसंगातून सुटका करण्यासाठी हा भगवान त्वरेने धाव घेतो. श्रीसाईबाबांनी आपले अवतारकार्य चालू करण्यासाठी शिरडी हे स्थान निवडले. ते स्थान त्यांनी आपल्या अवतारकार्यामुळे पुनित् बनविले. पृथ्वीवर प्रसिद्ध पण झाले. त्यांनी ह्या शिरडी गावातील श्रीमंत-गरीब लोकांना आपलेसे करून घेतले. त्यांची सुखदुःखे त्यांच्या अगदी जवळ जाऊन समजावून घेतली. आपल्या दैवी चमत्काराने अनेकांना दुर्धर व्याधीतून कायमचे दूर केले; वेळप्रसंगी दुसऱ्याचे दुःख आपल्याला घेऊन त्यांनी अनेकांना दुःखमुक्त केले.

दूरदूरचे लोक त्यांच्या दर्शनार्थ येऊ लागले. पण दर्शनाला येणाऱ्या लोकांना राहाण्यासाठी एकही वाडा अगर उतरण्यासाठी जागा नव्हती. याची त्या श्रीमाऊलीला दया आली, आणि त्या माऊलीने तीही उणीव भरून काढली. बाबांविषयींचा भक्तीचा जिव्हाळा भक्तगणात वाढू लागला. प्रेम वृद्धिंगत होऊ लागले. शुद्ध प्रेमामुळे भक्तांची तन्मयता सफल होवू लागली. त्यांनी शिरडीला मोठ्या संस्थानाचे रूप दिले. पहाटे काकड आरती व रात्री शेजारती होवू लागली. पहिल्या पहिल्याने बाबा स्वतःची पूजा करू देत नसत; पण पुढे पुढे ती ते करून घेऊ लागले. समाजात 'ग' ची बाधा असणारे लोक सुद्धा शिरडीत गेल्यावर साईबाबांजवळ नतमस्तक होऊ लागले त्यांची बोधपर रसाळ वाणी ऐकून विरघळून जाऊ लागले.

बाबांच्या भक्तगणांत सर्वजातीय, सर्व धर्मीय, सर्व वर्गीय लोक होते. उच्चकुलीन वर्गातील स्त्रिया, मोठमोठी हुद्देवाली माणसे तेथे येत होती; व ती कोणत्याही प्रकारची हलकी कामे सुद्धा करत असत. ती कामे करताना त्यांना कोणत्याही प्रकारचा कमीपणा वाटत नसे. कारण त्यांना बाबांची सेवा अगदी जवळून करायला मिळे हे एकच समाधान मिळत असे; आनंद मिळत असे. आनंदाचा संचार भक्तांच्या अंगात झाला म्हणजे भक्त आनंदाच्या त्रैलोक्यात संचार करतो. तो देहाने जगतच नसतो. त्याला सर्व जग शून्यवत् भासते. लाजलज्जा निघून जाते. उरते ती फक्त साईभक्ती! आणि त्यातून मिळणारा आनंद; तो आनंदही क्षणभंगूर नसून चिरकाल टिकणारा!

असे हे अनंतकोटी ब्रह्मांडनायक श्री साईबाबा शिरडीच्या जंगलात साकार झाले; त्यांची राहाणीही अत्यंत साधी होती. भक्तांकडे कोणतीही याचना ते करीत नसत; तर भक्तांनी जे काही भेट म्हणून आणलेले असेल तेच त्याला 'प्रसाद' म्हणून परत मिळत असे. ते नित्यक्रम फार नियमाने पाळीत असत. गावातच भिक्षेला जात. पण ठरलेल्या पाच घरी जाऊन जे मिळेल ते खात असत. नंतर थोडी विश्रांती घेऊन मग प्रवचने देत असत. त्यांचे उपदेश शाब्दीक बोधापेक्षा सुद्धा अनुभव रूपाने जास्त

असत. त्यामुळे ते लोकांना जास्त चटकन कळत. तो उपदेश भक्त लोकांना मौल्यवान पण वाटत असे. त्यामुळे श्रद्धेने येणाऱ्या भक्तांचे बाबांकडे अति उच्च प्रकारचे हीत होत असे.

बाबांच्या दर्शनार्थ येणाऱ्या भक्तांमध्ये हेतूःपुरस्सर लोक बरेच येत असत. परंतु त्यांच्या कामना पुरवून त्यांचे मन अत्यंत बेमालूमपणे हिताकडे ते वळवीत असत. दारी आलेल्या याचकाला ते कधीच रिक्त हस्ताने पाठवीत नसत. त्यांच्या हातून प्रसाद मिळाल्यावर मनोकामना सफल होतातच; असा भक्तगणांचा दृढ विश्वास होता. बाबांनी आपल्या नुसत्या अंगाऱ्याने. उदीने अनेकाना व्याधीमुक्त केले आहे. अनेकाना लहान मोठ्या अडीअडचणीतून कायमचे मुक्त केले आहे. त्यांच्या निर्वाणाला आता ६४ वर वर्षे होऊन गेली तरी सुद्धा द्वारकामाईत त्यांनी आपल्या अचाट योग सामर्थ्याद्वारे पेटविलेल्या धुनीतील उदी असंख्य भक्तांना शंभर टक्के उपयोगी पडत आहे. भक्त शिरडीची वारी आज करतात बाबांच्या समाधी स्थानाचे दर्शन व त्यांच्या उदीची प्राप्ती करण्यासाठीच.

श्री बाबांच्या उदीचा भक्तांना आलेल्या चमत्कारीक अनुभवांचा हा खास अंक वाचकांचे हाती देताना आम्हाला आनंद वाटत आहे. यापूर्वीही आम्ही अशाच प्रकारचा एक अंक भक्तांच्या हाती दिला होता त्याचे भक्तांनी मनापासून स्वागत केले होते. या अंकाचे पण ते स्वागत करतील अशी साईचरणी इच्छा प्रगट करतो.

जय साईराम, ओम साईराम


## साईबाबांच्या आरत्यांची कॅसेट

● शिरडीच्या श्रीसाईबाबांच्या मंदिरात काकड आरती, माध्यान्हआरती धूपारती व शेजारती अशा म्हटल्या जाणाऱ्या आरत्यांच्या सुश्राव्य कॅसेटस् नुकत्याच तयार झालेल्या आहेत. यातील आरत्या श्री. प्रभाकर कारेकर, अरविंद पिळगावकर, अजित कडकडे, प्रकाश घांग्रेकर, शरद जांभेकर, सौ. रजनी जोशी, कान्होपात्रा किणीकर, सौ. सुधा जोशी व कु. रेगे यांच्या गळ्यातून उतरलेल्या आहेत, संगीत दिग्दर्शन श्री. वासुदेव चंद्रचूड यांनी केले असून या कॅसेटस्ची किंमत अवघी ४२ रु. आहे. संपर्क श्रीसाई निकेतन, ८०४ बी. डॉ. आंबेडकर रोड दादर, मुम्बई ४०००१४ वेळ सोमवार ते शुक्रवार १०–३० ते ५–३० शनिवार १०–३० ते १–३०

# उदी ! नव्हे संजीवनी !

—श्री. पां. वा. भुतकर
२३/१६७५ अभ्युदय नगर मुंबई ३३

● साईबाबा जरी आज हयात नसले तरीही त्यांनी जिती जागती स्मृती ते हयात असतानाच इथे ठेवून दिली आहे. पवित्र अशी ही धुनीमाई साईबाबांनी पेट-विली होती व ती त्यांच्या पवित्र हातांची साक्ष देत अजून पेटतच आहे. हजारो गोणी उदी ती दररोज देतच आहे. लाखो लोकांची दुखणी ही उदी सध्या दूर करीत आहे. प्रश्न असा आहे की या उदीमध्ये संजीवनीचे सामर्थ्य कशामुळे टिकून आहे?

● ●बाबा हे प्रथम प्रथम लोकांना झाडपाल्याची तसेच इतर वनौषधी देत असत व त्यामुळे लोकाना गुण येई पण नंतर बाबांना कळून चुकले की ही औषधे आपण पृथ्वीवर आहोत तोपर्यंतच लोकाना देणार. नंतरच्या अनेक पिढ्यांना कोण औषध देणार? त्यांच्या लक्षात आल्याबरोबर त्यांनी ही झाडपाल्याची औषधे देणे बंद केले. औषध असे हवे की घेणाऱ्या पुढील पिढीलाही ते उपयोगी हवे. आपण हयात असू वा नसू आपण तयार केलेले औषध सदासर्वकाळ जनसामान्याना मिळाले पाहिजे. मग त्यांनी या गोष्टीवर बराच काळ विचार केला असावा, व अग्नीतून तावून सुला-खून निघालेली उदी हीच या कामी उपयोगी पडेल असे त्यांना वाटले.

एकदा औषधाचे स्वरूप निश्चित झाल्यानंतर बाबा सर्व लोकांना पोटात घेण्यास किंवा वरून लावण्यास उदीचेच औषध देत असत. बाबांची अंतःप्रेरणा त्यांची श्रद्धा हिचे मिश्रण म्हणजेच उदी! भिमाजी पाटलाचा क्षयरोग बाबांनी उदी देऊनच बरा केला. नानासाहेब चांदोरकर यांना देखील त्यांच्या घरी मुद्दाम उदी पाठवून त्यांच्या अडलेल्या मुलीची सुटका केली. उदीने बरी झालेली कितीतरी उदाहरणे आपणास साईसत्चरित्रात वाचावयास मिळतात.

उदी म्हणजेच विभूती किंवा रक्षा. सर्व संसार हा उदीसमान आहे. देह हा नश्वर आहे. त्याचे पतन झाल्यावर त्याची राख बनते ही वस्तुस्थिती लोकांच्या लक्षात यावी म्हणूनच बाबांनी लोकांना ही उदी औषधरूपाने द्यावयास सुरुवात केली. प्रसाद म्हणून देखील ते ही उदीच देत असत. सर्वसंग परित्याग केलेले साधू लोक ज्या-प्रमाणे अंगाला राख फासून सच्चिदानंद अवस्थेचा अनुभव घेतात. त्याचप्रमाणे सर्व-

सामान्यांना देखील चिरंतन सुखाचा शोध लागावा या दृष्टीने बाबांनी उदीची प्रेरणा केली असावी असे दिसते.

आता व्यवहारी माणसाच्या दृष्टीने पाहता आपणास असे दिसून येते की कोणत्याही रोगावर उदी गुणकारी ठरते. मोठमोठे डॉक्टर्स एकेका रोगावर दहा-दहा पंधरा-पंधरा औषधाची योजना करतात. पण उदी हेच एकमेव औषध हजारो रोगांवर कसे काय परिणाम करते ? या उदीला संजीवनीत्व कशामुळे प्राप्त झाले ? या सर्व प्रश्नांना फक्त एकच उत्तर आहे की बाबांनी आपल्या आयुष्यातील संपूर्ण श्रद्धा व असीम पुण्याई त्यात मिसळलेली आहे. हयातीनंतर देखील अदृश्य रूपाने बाबा ह्या उदीला आशीर्वाद देत आहेत. जोपर्यंत धुनीमाई पेटते आहे व उदीच्या लाखो गोणी देत आहे तोपर्यंत बाबांचे अखंड आशीर्वाद त्या पाठीमागे असणारच यात मुळीच संदेह नाही. उदीमागील प्रेरणा काहीही असो; एक गोष्ट मात्र निर्विवाद सत्य आहे की ही अल्पमोली व बहुगुणी उदी ही सर्वसामान्यांना सतत मिळत रहावयास हवी. मला खात्री आहे की पवित्र उदी देणारी ही धुनीमाई अखंड तेवत राहील. जगाच्या प्रलयकालापर्यंत सतत उदी देत राहील. सर्व मोठ्या लोकांच्या बाबतीत आपली एक म्हण प्रचलित आहे. 'मरावे परी किर्तीरूपे उरावे' बाबा हे फार मोठे सद्गुरु होऊन गेले. ते उदीरूपानेच आज जिवंत, हयात आहेत व आपल्या लाखो भक्तांना उदीतून भेटत आहेत.

●

## संत श्री गुलाबबाबा युगमहिमा कॅसेट

● काटेल कोलाद जि. बुल्ढाणा येथील संत श्री गुलाबबाबा यांच्या भक्तांच्या आग्रहास्तव पोथीरूप कॅसेट महाशिवरात्रीचे दिवशी उपलब्ध करण्यात आली आहे. या सी ९० कॅसेटमधील पोथीची कल्पना संत श्री शितोळे बाबांची असून तिचे संकलन श्री. पांडुरंग खाडे व लेखन श्री. वसंतराव निनावे यांनी केले आहे. आरती शाहीर विठ्ठलांची असून ती स्वरबद्द करण्याचे काम संगीत कार श्री. आनंद शर्मा यांनी केले आहे. गायक श्री विश्वजीत हे आहेत. तसेच श्री गुलाबबाबांच्या काटेल आश्रमाचे धावते दर्शन घडविणारी कॅसेट प्रसिद्ध झाली आहे. या कॅसेटस संबंधीची विशेष माहिती-संत श्री शितोळे बाबा, गुलाब बाबा दरबार, जिजामाता चौक, असल्फानगर घाटकोपर ( पश्चिम ) मुम्बई ८४ येथे करावी.

# 卐 उदी हेच औषध 卐

—कु. संजय सावळाराम गोवेकर
शिवनेरी बिल्डिंग ४/१७४
दादासाहेब फाळके रोड, दादर मुम्बई १४

नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य
नित्य घ्या प्रचित अनुभवे।

● खरंच बाबा अजूनही जिवंत आहेत, व आपले चमत्कार आपल्या भक्तांना दाखवतात.

माझी बहीण इयत्ता सातवीत होती. तिची वार्षिक परिक्षा सुरू होती. तिचा पहिला पेपर चांगला गेला. मात्र दुसऱ्या पेपरच्या दिवशी तिला ताप भरून आला. तिने पेपरचा अजिबात अभ्यास केला नव्हता. ती तापाने हैराण झाली. शेवटी तिला डॉक्टरकडे नेण्याची पाळी आली. मला बाबांची आठवण झाली. मी मनात म्हटले, कशाला डॉक्टरकडे न्यायचे. आपले बाबाच डॉक्टर आहेत ना! बाबा तर साऱ्या जगाचे डॉक्टर!! मी त्यांची उदी घेतली. थोडे तीर्थ केले व बाबांना प्रार्थना केली बाबा माझ्या बहिणीचा उद्या पेपर आहे. तिचे हे वर्ष फुकट जाता कामा नये, तेव्हा तुम्हीच तिला बरे केले पाहिजे, व ती ते तीर्थ पिऊन झोपी गेली.

आणि काय आश्चर्य! माझी बहीण सकाळी तीन वाजता उठून अभ्यास करून ती परिक्षेला गेली. पेपर देऊन आली तेव्हा मी विचारले पेपर कसा गेला! ती म्हणाली, अतिशय सोपा गेला, आणि आता तर ती चांगल्या गुणानी पास झाली.

खरंच बाबांची उदी म्हणजे एक प्रकारचे औषधच आहे. बाबांनी असेच आपल्या भक्तांसाठी संकटकाळी असेच धावून जावे, हीच बाबांच्या चरणी प्रार्थना.

# ऑल इंडिया शिरडी साईसमाजाचे
# २० वे यशस्वी अधिवेशन

ऑल इंडिया शिर्डी श्रीसाई समाजाचे विसावे अधिवेशन यंदा आंध्र प्रदेशातील नेल्लूर या गावी ७, ८, व ९ जानेवारी १९८३ हे तीन दिवस मोठ्या थाटाने साजरे करण्यात आले. आंध्र प्रदेशात याच सुमारास काही निवडणुका होत्या व त्या निवडणुका होऊन त्यांचे निकाल हे अधिवेशन चालू असताना लागत होते. बहुसंख्य निकाल तेथल्या जनतेच्या अपेक्षित बाजूने लागत होते त्यामुळे अधिवेशनाचे परिसरात आनंदाचे वातावरण पसरले होते.

ऑल इंडिया शिर्डी साई समाज ही जगप्रसिद्ध संस्था दक्षिणेत श्रीसाईबाबांचा प्रचार प्रसार करणारे प. पू. के. नरसिंह स्वामीजींनी १९४१ साली मद्रास येथे स्थापन केली. १९४६ सालापासून या संस्थेची अधिवेशने भरविली जात आहेत. अगदी पहिले अधिवेशन मद्रास येथे व दुसरे १९४८ साली कोईमतूर येथे भरविण्यात आले होते, त्यानंतर १९४९, ५०, ५१, ५२, ५४ व ५५ या साली अनुक्रमे मदुराई, कलकत्ता, धारवाड, पुणे, मुंबई व बडोदा अशी ३, ४, ५, ६, ७ व ८ अशी अधिवेशने भरविली गेली होती. १९८२ साली १९ वे अधिवेशन बंगलोर येथे भरविले गेले होते.

यंदाचे हे २० वे अधिवेशन नेल्लूर येथल्या गांधीनगर चौकातील श्रीसाईबाबा मंदिरातील आवारात भरविण्यात आले होते. नेल्लूर येथील हे मंदिर १९४१ साली स्थापन करण्यात आलेले असून या मंदिरात श्रीबाबांची तीन–चार फूट उंचीची संगमरवरी मूर्ती बसविण्यात आलेली आहे. मूर्तीच्या सभोवती चांदीची सुंदर अर्धवर्तुळाकृती कमान असून विजेच्या रोषणाईत कमान आणि मूर्ती मोठी खुलूनच दिसते या मंदिराचे सध्याचे व्यवस्थापक श्री. पोलीसेट्टी मालकोंडय्या बी. ए. हे आहेत. नेल्लूर साईभक्त मंडळी हे येथल्या साईमंदिर संस्थेचे नाव आहे.

विशेष म्हणजे यंदाच्या या अधिवेशनाला श्रीबाबांच्या रौप्य पादुका शिरडीहून भाविकांच्या, भक्तांच्या दर्शनाला मुद्दाम आणण्यात आल्या होत्या. गुरुवार ता. ६ जाने. रोजी सायंकाळी ठीक ६ वा. मुंबईहून रेणूगुंठा मार्गे या चांदीच्या पादुका नेल्लूर येथे पोचल्या. तेव्हा तेथल्या गांधीनगर या भर वस्तीतील चौकांतून त्यांची वाजत–गाजत शेकडो भक्तांच्या समवेत मिरवणूक काढण्यात येऊन ती श्रीसाईमंदिरात नेण्यात

झाली. त्याच रात्री शेकडो भाविकांनी त्या पादुकांचे दर्शन घेत असतानाच मंदिराच्या आवारात, प्रसन्न वातावरणात व विजेच्या रोषणाईत श्रींच्या भजनाचे विविध कार्यक्रम झाले.

शुक्रवार दिनांक ७ जानेवारीस सकाळपासूनच कार्यक्रमास सुरवात झाली असली तरी खऱ्या अर्थाने सायंकाळी ५ वाजता रितसर कार्यक्रम सुरू झाले. प्रथम मंदिराच्या ध्यान मंदिरातील तीन प्रतिमांचे अनावरण करण्यात आले. श्रीसाईबाबांच्या प्रतिमेचे अनावरण डॉ. श्री. दि. परचुरे कार्यकारी संपादक श्रीसाईलीला इंग्रजी आवृत्ती, यांचे शुभहस्ते करण्यात आले तर प. पू. श्री. नरसिंह स्वामीजी यांच्या तैलचित्र प्रतिमेचे अनावरण श्री. के. व्ही. रमणमूर्ती काकीनाडा व श्रीराधाकृष्ण स्वामीजींच्या प्रतिमेचे अनावरण बंगलोरचे श्री. भास्कर राव यांचे शुभ हस्ते करण्यात आले.

पुढे नेल्लूर जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेच्या इमारतीच्या परिसरातील भव्य मंडपात जाहीर कार्यक्रम पार पाडण्यात आले. अधिवेशनाचे उद्‌घाटन दक्षिणेतील वयोवृद्ध ज्ञानमहर्षि ताडपल्ले राघव नारायण शास्त्री गुरू चंडोल, गुंतूर जिल्हा यांनी केले, यानंतर नेलूर साईभक्त मंडळीचे चिटणीस श्री. पी. माल्कोंडय्या यांनी नेल्लूर येथील श्रीसाईबाबा मंदिराचा इतिहास व तेथील विविध उपक्रमांची माहिती करून दिली. अधिवेशनाला आलेल्या थोरामोठ्यांचे संदेश वाचून दाखविण्यात आले. नंतर अधिवेशनाचे अध्यक्ष व मद्रास हायकोर्टाचे सेवानिवृत्त न्यायाधिश श्री. एन्. कृष्ण-स्वामी रेड्डी यांचे अध्यक्षीय भाषण झाले. त्यानंतर या अधिवेशनानिमित्त प्रकाशित करण्यात आलेल्या स्मरणिकेचा प्रकाशन समारंभ डॉ. गजाननराव दाभोलकर श्रीसाई सच्चरित्रकार हेमाडपंताचे चिरंजीव यांचे शुभहस्ते करण्यात आला. रात्री दहा वाजता नेलूर येथल्या एल. पी. हॉलमध्ये श्री. के. व्ही. रमणमूर्ती काकीनाडा, लिखित शिर-डीच्या साईबाबांचे जीवन या तेलगू नाटकाचा २२६ वा प्रयोग दाखविण्यात आला. या नाटकात स्वतः लेखक व त्यांच्या पत्नीने पण भाग घेतलेला होता. हे नाटक अतिशय उत्कृष्ट झाले.

दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवार ता. ८–१–८३ रोजी सुप्रभातम, भजन, अभिषेक अर्चना इ. विधी झाल्यावर देशातील विविध साईसंस्थांचे उपक्रमाबद्दल अनेकांची भाषणे झाली, यामधून श्री. टी. केशवराव मद्रास, श्री. विश्वनाथन मद्रास, श्री. जे. के. पुरी, चन्दीगड, डॉ. परचुरे व श्री. सदानंद चेंदवणकर इ. ची भाषणे झाली. यानंतर सौ. भवानीबाई यांचा हरिकथाचा अत्यंत बहारदार एकपात्री असा कार्यक्रम झाला. सायंकाळी श्री. एन. हनुमंता राव ॲण्ड पार्टी यांची भक्ती गीते श्री. आर. कृष्णा मुर्ती यांची गीते, नृत्यनाटिका असे कार्यक्रम झाले.



हैद्राबादचे संत श्री विठ्ठलबाबा यांनी नेलूरच्या अधिवेशनात श्रीबाबांच्या चित्रांचे एक छानदार प्रदर्शनही भरविले होते. भक्त मंडळी प्रदर्शन बघत असताना.



श्री. विठ्ठलबाबांच्या प्रदर्शनातील बाबांची चित्रे चितारणारे कुंचलेबहाद्दराचा गौरव डॉ. परचुरे करीत असताना.

रविवारी सकाळीच मात्र कोंडव्या पल्लम येथल्या मदर थेरेसा यांच्या आश्रमात सर्व मंडळी गेली व तेथल्या अनाथ, अपंग, अधू मुलामुलींना साईंचा प्रसाद म्हणून भरपूर खाऊ वाटण्यात आला. तसेच सर्व मुलांना स्टेनलेस स्टीलची ताट-वाट्या, ग्लासे ही पण संस्थेतर्फे वाटण्यात आली. आलेल्या काही पाहुण्या मंडळींनी पण आश्रमाला भरभर आर्थिक सहाय्य पण केले.

रविवार ता. ९-१-८३ च्या कार्यक्रमात विविध विषयावर ठिकठिकाणाहून आलेल्या प्रतिनिधींचा चर्चात्मक कार्यक्रम झाला. तर दुपारच्या कार्यक्रमात ठिकठिकाणाहून आलेल्या पदाधिकाऱ्यांचे विविध विषयावर व प्रश्नावर मार्गदर्शनपर सूचना कार्यक्रम झाले. या कार्यक्रमात डॉ. श्री. दि. परचुरे व श्री. सदानंद चेंदवणकर कार्यकारी संपादक श्री साईलीला अनुक्रमे इंग्रजी व मराठी आवृत्ती यांची पण भाषणे झाली. रात्री राजकुमारी प्रभावती माताजी यांचा श्रीसाईबाबा विषयक आख्यानाचा अत्यंत श्रवणीय असा कार्यक्रम झाला, व आभारप्रदर्शनानंतर हा तीन दिवसांचा सोहळा संपला.

या अधिवेशन प्रसंगी बाहेरगावाहून आलेल्या सुमारे शंभरावर स्त्री-पुरुष प्रतिनिधींची चहापान, कॉफीपान, नाष्टा व भोजन इ. ची सर्व ती चोख व सुंदर व्यवस्था करण्यात आली होती.

---

## साईभक्त पणशीकर यांचे अभिनंदन

महाराष्ट्रातील एक नामांकीत अध्यात्मवादी, भगवत् गीतेवरील एक प्रसिद्ध प्रवचनकार व साईभक्त श्री. व्ही. व्ही. उर्फ आबासाहेब पणशीकर यांची स्वित्झर्लंड मधील विंटरथुर या शहरातील स्वामी श्री. ओंकारानंदजींच्या आश्रमात प्रमुख आचार्य म्हणून नेमणूक करण्यात आली असून या आश्रमात स्वीस-जर्मन तरुणांना हिंदुकरून घेण्यात येते. याच आश्रमातर्फे पश्चिम जर्मनीत ब्युसिंगन येथे नव्यानेच सुरू होणाऱ्या संस्कृत विद्यापीठाचे रजिस्ट्रार म्हणूनही त्यांची नेमणूक करण्यात आली आहे. या बरोबरच श्री ओंकारानंद मठाचे उपाध्यक्ष व त्या देवस्थानचे मुख्य प्रशासक म्हणूनही त्यांचेवरच जबाबदारी सोपविण्यात आली आहे. श्री. ओंकारानंदजी महाराज हे मूळ सिकंदराबादचे असून त्यांनी १९६५ साली आश्रमाची स्थापना केली असून ते ऋषीकेषच्या स्वामी शिवानंद महाराजांचे पट्टशिष्य होत. स्वामीजींचा आश्रम हा युरोपात फार मोठा समजला जातो. श्री स्वामी ओंकारनंदजी महाराज हे लहान पणापासूनच कट्टर साईभक्त आहेत. नव आश्रमात त्यांनी बाबांचे एक मंदिरही बांधले आहे. श्री. पणशीकरांच्या या नव्या सेवे बद्दल मनापासून अभिनंदन.

# श्रीसाईलीला लेखक–कवी नववे स्नेहसंमेलन शिरडी–१९८३

—साईनंद

● श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या श्रीसाईलीला या मुखपत्राच्या लेखक–कवींचे नववे स्नेहसंमेलन रविवार ता. ३० व सोमवार ता. ३१ जानेवारी १९८३ या तारखांना शिरडी येथे भरविण्यात आले होते. १९७५ साली अशा स्वरुपाचे संमेलन प्रथमच भरविण्यात आले होते. तेव्हापासून यंदाच्या वर्षापर्यंत ही परंपरा कायम आहे. यंदा ९० वर लेखक–कवींचा मेळावा एकत्र आला व दोन दिवसांचा सुखद सोहळा सुव्यवस्थितपणे यशस्वी पार पडला.

श्रीसाईलीला मासिकामधून गेल्या नऊ वर्षात निदान तीन तरी लेख किंवा कविता ज्या साहित्यिक भक्तांच्या छापल्या गेल्या आहेत अशानाच निमंत्रण देण्यात आले होते. यंदा हे संमेलन शांतिनिवास या नवीन निवासस्थानाच्या तळमजल्यावरील प्रशस्त हॉलमधील अर्ध्या भागात भरविण्यात आले होते. तिथे मुलायम गादीच्या बैठका अंथरून बसण्याची सोय करण्यात आली होती. या संमेलनास अध्यक्ष म्हणून कोल्हापूरचे प्रख्यात वयोवृद्ध साईभक्त व श्री बाबांच्या कृपाशिर्वादाने एम. बी. बी. एस. डॉक्टर झालेले श्री. राजाराम सीताराम कापडी हे लाभले होते. डॉ. श्री. कापडी यांचे वय सध्या ८७ वर्षाचे असून गेल्या गणेशोत्सवात त्यांनी श्री. राम गणेश गडकऱ्यांच्या 'भावबंधन' या नाटकातून धुंडीराजाची यशस्वी भूमिका केलेली होती. १९१८ साली त्यांना श्री बाबांचे अगदी जवळून दर्शन घडले, आशिर्वाद लाभला व तेव्हापासून त्यांना बाबांच्या बद्दल जो जिव्हाळा, प्रेम, आदर, भक्तीभाव वाटत आहे तो आजपर्यंत अगदी तशाच्या तसाच कायम आहे. संमेलनास माजी अध्यक्ष या नात्याने साईसच्चरित्रकार हेमाडपंतांचे चिरंजीव डॉ. गजाननराव दाभोलकर, इंदूरच्या सौ. प्रभाताई मुळ्ये, नगरचे श्री. ग. ज. चितांबर, श्री. नानासाहेब रासने हे उपस्थित होते. याशिवाय मद्रास येथील ऑल इंडिया साई समाजाचे सध्याचे अध्यक्ष श्री. टी. केशवराव, त्या संस्थेचे चिटणीस श्री. विश्वनाथन, मुंबईचे प्रख्यात साईभक्त व दादर येथील साईभक्त मंडळाचे सर्वस्व डॉ. एम. के. कितीकर, मँचेस्टर येथे कापड उद्योग धंद्यातील विविध विभागांचे तांत्रिक शिक्षण घेतलेले व मफतलाल उद्योग

समूहातील एक अधिकारी श्री. द्वारकेशभाई शहा श्री. बोरावके ही पाहुणेमंडळी पण हजर होती.

संमेलनास मुम्बईहून सर्वश्री डी. आर. खडके, अनिल रसाळ, रमाकांत पंडित, विजय हजारे, माधव गोरे, सौ. वसुंधरा चोरे, सौ. कलावती चव्हाण, राधाकृष्ण गुप्ता, अनिल रिसबुड, श्रीराम सातर्डेकर, सौ. कुमदिनी टिळक, सौ. अस्मिता दांडेकर, सौ. सुशिलाबाई हजारे, सौ. तारा चेंदवणकर, श्री. ग. रा. पालकर, श्री. वसंतराव प्रधान, श्री. प्रभाकर कोळमकर, श्री. विपिन स्वादीया, डॉ. अ. का. पाठक, सूर्यकांत दळवी, श्री, डी. आर. दळवी, सौ. शांता सरोदे, लीलाताई गोलतकर, श्री. मधुसूदन करंबेळकर, सुरेश सातपुते, सौ. शशिकला रेवणकर, श्री. बेलवलकर इ. लेखक कवी मंडळी आली होती. बद्रीनाथहून श्री. संजयानंद स्वामी व मीरा संजयानंद हे संत आलेले होते. लोणावळयाहून डॉ. इंदूताई नाईक व डॉ. सुमती खानविलकर हजर होत्या. पिंपरीहून श्री. व सौ. पोतनीस पतीपत्नी उपस्थित होती. पुण्याहून श्री. दत्तात्रय मोरे, रघुनाथ सांडभोर, श्री. एम. बी. निंबाळकर, सौ. उषाताई मुळये, सातान्याहून श्री. पांडुरंगराव भुजबळ, डॉ. एम. जी. शिंदे, श्री. प्रभाकर कांबळे, बडोद्याहून श्री. मधुकरराव अंबाडे, धुळयाहून श्री. नागेश मोगलाईकर, सौ. लीलाताई मराठे, श्री. जगदीश देवपूरकर, नवापूरहून श्री. रमेश चव्हाण, श्री. हसमुख पाटील, श्री. मधुकर मंडलिक, शांतीलाल दवे, बिदरहून प्रा. गुंडेराव पटवारी, डॉ. हिब्बारे व सौ. मथुराबाई हिब्बारे, भंडान्याहून डॉ. मालती राहाटे, शिरूडहून श्री. बी. डी. जगतपुरिया, नांदेडहून श्री. लक्ष्मणराव रापतवार, इंदूरहून श्री. बापूसाहेब निरखे, श्री. प्रकाश कर्वे डॉ. बाबाजी, चंदीगडहून श्री. जुगलकिशोर पुरी, गरसलहून श्री. गोयल, काटोलहून सौ. सिंधु कृष्णराव सणस, कानपूरहून डॉ. बी. जी. दास, कलकत्त्याहून सौ. सरोजिनी देवी राजुल, मद्रासहून श्री. आर. एस. रामकृष्णन, हैद्राबादहून श्री. एम. गंगा रेड्डी खुद्द शिरडीच्याच श्रीमती लीलाताई गुजराथी व निवृत्ती गोंदकर पाटील व श्री. महेशभाई वैष्णव, श्री. लुतडे, श्री. रणजित पाटील, प्रकाश लालवाणी, व्ही. सुंदरम, ब्रिजमोहन मौर्य इ. मंडळी हजर होती.

रविवार ता. ३० जानेवारी १९८३ रोजी सकाळी ठीक साडे नऊ वाजता या संमेलनाचे उद्घाटन "स्वर्गधरेच्या सीमेवरती भूलोकीची अमरावती ही." या स्वागत गीताने झाले. श्री. परुळेकर रचित हे गीत साई भक्त श्रीराम सातर्डेकर यांच्या कंठातून तबला पेटीच्या सुरेल साथीत गाईले गेले. नंतर या संमेलनाचे रितसर उद्घाटन व सर्व उपस्थित पाहुण्यांचे स्वागत मा. श्री. क. हि. काकरे साहेब, कोर्टरिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांनी केले. नंतर श्रीसाईच्या प्रतिमेस पुष्पहार

घालून व त्यांच्या समोर समईची अखंड ज्योत तेवत ठेऊन अध्यक्ष डॉ. कापडी यांनी संमेलनाच्या कार्यास सुरवात केली.

प्रथम श्री. सदानंद चेंदवणकर यांनी या संमेलनाची संपूर्ण योजना व दोन्ही दिवसांचा कार्यक्रम सांगितला. त्यानंतर अध्यक्ष डॉ. कापडी यांचा परिचय डॉ. परचुरे यांनी करून दिला. यानंतर श्रीसाईलीलाच्या फेब्रुवारी १९८३ च्या श्रीसाईकाव्य बहार या खास अंकाचे व इंग्रजी आवृत्तीचेही अध्यक्षांचे शुभहस्ते प्रकाशन झाले. ज्या कवींनी या अंकात हजेरी लावली होती व जे तिथे या प्रसंगी हजर होते अशा ३२ कवींना अध्यक्षांचे शुभ हस्ते अंकाची भेटप्रत व प्रसादरूपी पुरस्कारही देण्यात आले।

३० जानेवारी असल्याने ११ वाजता भोंगा वाजवला गेला व राष्ट्रपिता महात्मा गांधीजींना व दिवंगत साईभक्त व हुतात्मे तसेच संस्थानचे दिवंगत कर्मचारी रेशमाताई पवार, भाऊसाहेब खोत, ताई निमोणकर इ. ना सर्व मंडळींनी मिनिटभर उभे राहून श्रद्धांजली वाहिली गेली.

यानंतर अध्यक्ष डॉ. कापडी यांचे प्रास्ताविक भाषण झाले ते असे :

## डॉ. कापडी यांचे प्रास्ताविक भाषण

ओम नमोजी साईनाथा । तव चरणी ठेविला माथा ।
विलया नेई भवभय व्यथा । शिर्डीग्राम निवासी साई प्रभो ।

साईलीलेचे मुख्य संपादक मे. श्री. क. हि. काकरे, दोन्ही इंग्रजी आणि मराठी मासिकांचे कार्यकारी संपादकद्वय श्री. परचुरे व श्री. चेंदवणकर व संमेलनाला जमलेले साईभक्त, मागील अध्यक्ष व साईभक्त बंधुभगिनींनो—

श्री साईबाबांच्या कृपेने व तुम्हा सर्वांच्या सद्भावनेने नवव्या कवी–लेखक संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचे भाग्य मला लाभले हे मला जणू अमृतफळ मिळाले असे मी मानतो. साईसेवेची संधी अव्याहत तीन वर्षे मिळाली. कवी–लेखक संमेलनास हजर राहण्यास माझी आयुमर्यादा वाढली ही सुद्धा परमेश्वरी साईशक्ती लीलाच होय.

इ. स. १९१८ साली साईबाबांकडे येण्याची प्रेरणा मला जर झाली नसती तर मी वडिलांच्या तंबाखुच्या गादीवर बसून विडी–तंबाखुची बंडले आयुष्यभर मोजीत राहिलो असतो. इ. स. १९१८ पर्यंत मला बाबांचे नावसुद्धा माहित नव्हते. परंतु माझे बंधु कै. सखाराम सिताराम कापडी उर्फ आण्णा हे आपले आर्टिस्ट मित्र श्री.

रामभाऊ देशपांडे यांच्या बरोबर १९१८ तच शिर्डीला येऊन गेले. त्यांनी बाबांची महती गाण्यास सुरुवात केली. त्यामुळे मला बाबांचे दर्शन घेण्याची उत्कंठा लागली.

आमच्या सारखी चिडीची बच्ची, बाबांनी पायाला दोर बांधून कोणाला स्वप्नात दर्शन देऊन, कोणाला फूटपाथवर विक्रीस ठेवलेले बाबांचे फोटो पाहून आपल्याकडे खेचून आणले. त्यांपैकीच मी एक आहे, असे मी मानतो. हे सुद्धा मी माझे भाग्यच समजतो. नाहीतर आज जाऊ उद्या जाऊ असे मी मी म्हणणारे लोक जसे बाबांच्या पदरज कणाचे दर्शन घेण्यास सुद्धा मुकले व शेवटी हळहळले तशी माझी स्थिती झाली असती.

त्यावेळी शिर्डी गाव हे सामान्य खेडे होते. कोपरगावला रेल्वेने जाऊन खटाऱ्याने अगर टांग्याने जावे लागे. श्रीमंत नागपूरचे बुट्टी, साठे, दिक्षीत वगैरेचे दोन तीन वाडे होते. हल्ली साई मंदिराच्या उजव्या बाजूस सिंधी वगैरेची भरगच्च दुकाने आहेत त्या जागी तेथे खेडवळ पद्धतीची धाब्याची घरे होती. तेथील एका बाईच्या घरी आमची राहण्या—जेवणाची सोय झाली.

आम्ही बहुधा गुरुवारी सकाळी शिर्डीला पोहचलो. त्यावेळी बाबांची स्वारी मशिदीतून लवाजम्यानिशी लेंडीबागेकडे निघाली होती. झटपट हातपाय धुवून आम्ही बाबांच्या दर्शनासाठी त्या गर्दीत शिरलो.

कोपऱ्या कोपऱ्यावर बाबा थांबत. त्यावेळी दर्शनासाठी झुंबड लागे. प्रत्येकवेळी बाबा थांबले की थांबले, आम्ही बाबांच्या पदस्पर्शासाठी थांबत असू. बाबा अनवाणी चालत असत. 'अरे कशाला धावता, एकदा दर्शन झाले ते पुरे.' असे म्हणत असलेले आम्ही ऐकले होते असे मला आठवते.

त्याच रात्री बाबांची चावडीत झोपण्यासाठी एक दिवसाआड जात तोच हा दिवस होता. दोन प्रहरी ३—४ वाजल्यापासून पालखी फुलांच्या माळांनी शृंगारली जाई. एकीकडे पालखी शृंगारली जात असताना भजनाचा फड टाळ मृदुंगाच्या बाबांच्या जय जय करीत जोषात येई.

रात्री पालखी निघाली म्हणजे बाबांचा शृंगारलेला घोडा शामा आघाडीवर असे. फटाके वगैरे दारू सामान लावणारी मंडळी दिंडीच्या जरा पुढे आतषबाजीच्या मस्तीत बाबांचा जयजयकार करीत चावडीवर पोहचल्यावर बाबांची बैठक तयार असे. बैठकीची जागा फळयाने बांधलेली स्वतंत्र ठेविलेली होती. पूजा अर्चा सुगंधी द्रव्ये

पायाला लावण्यात येई. त्याच वेळी तंबाखुची भरलेली चिलीम पेटविली जाई. बाबांनी झुरका मारल्यावर ती भक्त मंडळीत गरगर फिरे. आम्ही दारातच उभे राहून हा विलोभनीय सोहोळा पहात होतो. साई-सच्चरित्रात वर्णन केल्या प्रमाणे हुबेहुब हा सोहळा प्रत्यक्ष पहाण्याचे भाग्य अगदी जवळून पहायला मिळाले. बाबांच्या संन्निध जेवढा वेळ घालविता येईल तेवढा घालविण्याची आम्ही पराकाष्ठा केली.

दुसऱ्या दिवशी सकाळ पासून दर्शनाची बारी लागे. जेवण झाल्यावर निघेपर्यंत आम्ही ३-४ वेळा तरी बाबांच्या पायांच्या धुळीकणाने पुनीत झालो. प्रत्येक खेपेला बाबांनी मागितल्याशिवाय त्यांच्या हाती एक एक रूपया ठेवला.

आमचे रेल्वेचे रिटर्न तिकीट काढले असल्यामुळे आम्हाला दोन प्रहरी जेवणा-नंतर निघण्याची घाई सुरू झाली. त्याच तिकीटावर आम्हाला नासिक क्षेत्र गाठावयाचे होते. मी बाबांना विचारले की, माझे मन दोलायमान झाले आहे, वडीलांच्या धंद्यात पडावे की शिक्षण चालू ठेवावे. मी मॅट्रीक पास झालो आहे. बाबांनी ताबडतोब उत्तर दिले, डॉक्टर हो. बाबांचा हा आशिर्वाद मिळाल्यावर माझा हर्ष गगनात मावेनासा झाला.

आमच्या हातून मात्र अजाणतेने एक घोडचुक झाली. निघताना आम्ही बाबांचा निरोप घेतला नाही. निरोपाची उदी घेतली नाही. आणि त्याचे प्रायश्चित आम्हाला हातोहात मिळाले. नाशिकला उतरून स्नान करून स्टेशनवर येईपर्यंत रात्रीचे नऊ वाजले. खिशात तिकीटाशिवाय शिल्लक काही राहिले नाही. माझ्या मित्राच्या खिशात चुरमूरे घेण्यापुरते चिल्लर पैसे होते. बाबांचा निघताना निरोप घेतला नाही, त्याला चुरमूरे फाक्या मारीत खात जावे लागते किंवा काही संकट तरी ओढवते असे साईसच्चरित्र ग्रंथात लिहिले आहे त्याचा अनुभव आला.

अध्यक्षांचे प्रास्ताविक भाषणानंतर संमेलनाला उपस्थित असलेल्या लेखक-कवींचा परिचय करून देण्यात आला. येथवर बारा वाजले होते. तेव्हा दुपारच्या कार्यक्रमाची व आरती-प्रसाद याबाबतची सूचना देण्यात आली व लेखक-कवी भक्त मंडळी श्रीबाबांच्या दुपारच्या आरतीला गेली. यावेळीही प्रसाद ग्रहणासाठी नव्या भोजनगृहातील शेवटच्या ४ रांगा संमेलनातील मंडळींसाठी मुद्दाम राखून ठेवण्यात आल्या होत्या. प्रसाद ग्रहणानंतर अल्प विश्रांती होऊन दुपारी ठीक ३.३० वा. दुसऱ्या सत्रास सुरुवात झाली.

दुपारच्या सत्रापूर्वी काही मंडळींनी २ वाजताच आपापल्या गीतांचा कार्यक्रम संमेलनस्थानी सुरू केला होता व तो काही प्रमाणात रंगलाही.

दुपारच्या सत्रात श्री साईलीला मासिकाच्या विकासाच्या दृष्टीने चर्चा करण्यात आली. या चर्चेसाठी अनेकांनी लेखी सूचना पाठविल्या होत्या. सूचना पाठविलेल्या लेखकांची नावे अशी-श्री. रमेश चव्हाण, नवापूर; श्री. स. व्यं. कुलकर्णी, कोल्हापूर; श्री. राधाकृष्ण गुप्ता, डोंबीवली; श्री. मधुकर अंबाडे, बडोदा; श्री. अनिल रिसबुड, शिरगांव; श्री. अनिल लुतडे, वर्धा; सौ. लीला मराठे, धुळे; श्री. जगदीश देवपूरकर, धुळे; श्री. हसमुख पाटील, नवापूर; श्री. हेमन्त हळबे, व श्री. रघुनाथ सांडभोर, पुणे; सौ. रेवणकर, अंबरनाथ; श्री. व सौ. पोतनीस, पिंपरी; श्री. मधुकर वखारे, मुंबई; श्री. लक्ष्मण रापतवार, नांदेड; डॉ. ब्रजमोहन मौर्य, यु. पी.; श्री. चिंतामण दापरे, मोठी दमण, डॉ. जी. आर. विजयकुमार, श्री. आर. एस. रामकृष्णन, मद्रास; डॉ. बी. जी. दास, कानपूर; श्री. एन. मच्छिदरदास, वारंगळ; श्री. माधव गोरे, कुर्ला; श्री. श्रीराम सातर्डेकर, परळ; श्री. जी. के. निरखे व कर्पे, इंदूर इ. नी लेखी सूचना पाठविल्या होत्या. त्यापैकी उल्लेखनीय सूचना अशा-

१) स्वानुभव अंक व काव्यबहार विशेषांक वर्षातून दोनदा प्रसिद्ध करावेत.

२) समाधी मंदिरासमोरील सरंजामे बागेत दशावताराच्या मूर्ती बसविलेल्या आहेत त्या मूर्तीखाली इंग्रजी भाषेत सुंदर विचार लिहिलेले आहेत ते १० विचार इंग्रजी व मराठी अंकात प्रसिद्ध करावेत.

३) संमेलन संपल्यावर लगेच खोल्या खाली करावयास न लावता दुसऱ्या दिवशी दुपारी १ वाजेपर्यंत लेखक-कवींना खोलीत रहाण्याची मुभा असावी.

४) लेखक-कवींच्या आलेल्या सूचना संमेलन सुरू होताच पहिल्या दिवशीच वाचून दाखवाव्यात त्यामुळे त्यावर सर्व मंडळींना विचार विनिमय करणे सोयीचे होईल.

५) उत्कृष्ट संपादकीय व अंकातील एकंदरीत मजकुराबद्दल कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांचे अभिनंदन करावयास हवे.

६) लेखक-कवींची पत्यासहित टंकलिखित सूची केल्याबद्दल श्री. प्रकाश कर्पे इंदूर यांचे अभिनंदन करावयास हवे.

७) संमेलना बाबतचा फॉर्म दिवाळी अंकातच प्रसिद्ध केल्या बद्दल संपादकांचे अभिनंदन करावयास हवे.

८) साईलीलाकडे पाठविलेल्या साहित्याची पोच येते पण निर्णय कळविला जात नाही तो लौकर कळवावा.

९) संमेलनात भेटी दाखल संस्थानची रोजनिशी दिली जावी.

१०) मासिकाचा आकार व पृष्ठसंख्या वाढवावी व त्याबरोबरच वर्गणी पण वाढवावी.

११) अंकातून प्रसिद्ध झालेले भक्तांचे उत्कृष्ट अनुभव एकत्रित करून ते पुस्तक रूपाने प्रकाशित करावेत.

१२) यदाकदाचित् पोस्टाच्या गोंधळामुळे अंक न मिळाल्यास तक्रार केलेल्या वर्गणीदारास अंक पुन्हा पाठविला जावा.

१३) साईलीलाची संपूर्ण हिंदी आवृत्ती काढावी.

१४) संमेलन तीन दिवस भरवावे. पुढील वर्षी संमेलनाला १० वर्षे पूर्ण होतात त्याप्रित्यर्थ ३ दिवसांचा दशकोत्सव करावा.

१५) देशातील ठिकठिकाणच्या साईमंदिरातील बाबांची छायाचित्रे जमवून संमेलन प्रसंगी त्यांचे प्रदर्शन भरवावे.

१६) साईबाबां बद्दल हवे ते विचारा हा रंजक कार्यक्रम संमेलनातून अवश्य यापुढे व्हावा.

१७) विदर्भातील लेखकांना मासिकातून वाव द्यावा.

१८) काव्यबहार विशेषांक वर्षातून दोनदा प्रसिद्ध करावा.

१९) लेखक–कवींना रोख पुरस्कार देण्या ऐवजी लॉकेट किंवा बाबांचा फोटो भेटीदाखल द्यावा.

२०) बाल विशेषांकातील बाललेखकांना पण साईप्रसाद द्यावा.

२१) संमेलनातील लेखक कवींना चहा भोजनाच्या कूपना बरोबरच अभिषेक कूपने पण द्यावीत.

२२) स्वानुभव विशेषांक दोनदा प्रकाशित करावा.

२३) काय वाटेल ते होवो दरवर्षी साईलीलांचे संमेलन व्हायलाच पाहिजे.

२४) दादर साईनिकेतन मधील कार्यालयाची वेळ अंकात छापली जावी.

२५) 'जर साईबाबा आज असते' असा परिसंवाद यापुढे संमेलनात ठेवावा.

२६) लेखक–कवींनी संपादकांना पाठविलेल्या अभिप्राय पत्रास अंकातून प्रसिद्धी द्यावी. इ. अशा महत्वपूर्ण सूचना केल्या होत्या. सूचनांचा हा संपूर्ण कार्यक्रम पहिल्या दिवशी सायंकाळ पर्यंत चालू राहिला सायं. ६ वा. श्रींच्या आरतीची वेळ झाल्याची सूचना देण्यात आली व मंडळी श्रीसाई समाधी मंदीरात गेली. आरती नंतर श्रींच्या दरबारात लेखक–कवीनी हजेरी लावण्याची जणू चढाओढच लावली, व त्यामुळे अनेकांना संधी भरपूर मिळाली तर काहीना उद्या सायंकाळी पर्यंतची प्रतिक्षा करावी लागली. रात्री प्रसाद ग्रहणाचा कार्यक्रम सकाळ प्रमाणेच झाला.

सोमवार ता. २१ रोजी सूचनांचा कार्यक्रम चालूच होता त्यातच बडोद्याहून नव्यानेच संमेलनाला आलेले कवी श्री. मधुकरराव अंबाडे यांनी संमेलनावर तिथल्या तिथेच रचलेली एक कविता वाचून दाखविली. मद्रासचे ए. आय. एस. एस. चे

अध्यक्ष श्री. टी. केशवरात्र व श्री. विश्वनाथन लौकरच सवृश्री निवाले म्हणून अध्यक्षांचे हस्ते त्यांचा पुष्पहार व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. साकोरीच्या प. पू. श्री गोदावरी माताजी यांनी आपले खाजगी सचिव डॉ. शांताराम टिपणीस यांचेबरोबर संमेलनाला शुभेच्छा पाठविल्या होत्या. त्या डॉ. टिपणीस यांनी छोट्याशा भाषणात कथन केल्या. त्यांचाही सत्कार करण्यात आला. श्री. टी. केशवराव व श्री. विश्वनाथन यांची या प्रसंगी लहान लहान भाषणेही झाली, व संमेलनाला उपस्थित रहाण्याची संधी मिळाली म्हणून त्यांनी आभार प्रदर्शित केले. संमेलनाला एक प्रेक्षक पाहुणे म्हणून असलेले कुडाळचे प्रख्यात काँग्रेस कार्यकर्ते श्री. वसंतराव पडते यांनी बाबांचे श्रीसाईलीला मासिक विनामूल्य द्यावे अशी सूचना केली व त्या सूचनेचे टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. येथवर दुपारचे १२ वाजले होते. त्यामुळे आरती व प्रसादाची सूचना देण्यात आली. अनेकांची संकष्टचतुर्थी होती म्हणून त्यांनी साबुदाण्याच्या खिचडीचा प्रसाद ग्रहण केला.

दुपारच्या कार्यक्रमात अनेक सोहळे संपन्न करण्यात आले. श्रीसाईलीलाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांचे चिरंजीव श्री. सुभाषचंद्र यांनी आपल्या शुभविवाहाप्रित्यर्थ सर्व उपस्थितांना पेढे व खाऊ वाटला. सर्व उपस्थित लेखक कवींचे तर्फे श्री. सुभाष व सौ. शुभांगी चेंदवणकर यांचा अध्यक्षांचे शुभहस्ते अहेर हार व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. श्री. काकरेसाहेब, संपादक श्री. परचुरे व श्री. चेंदवणकर यांचाही लेखक–कवी मंडळीतर्फे दरवर्षीप्रमाणे सत्कार करण्यात आला. श्री. बिपीन खाडिया यांच्या छोट्या कन्यकेने काही रंजक कार्यक्रम सादर केले व तिचेही रसिक कवींनी भरपूर स्वागत केले. यानंतर श्रीसाईलीलाचे मुख्य संपादक व कोर्टरिसिव्हर श्री. क. हि. काकरेसाहेब यांचे समारोपाचे भाषण झाले. आपल्या भाषणात त्यांनी संमेलन यशस्वीरणे पार पाडल्याबद्दल श्रीसाईंचे आभार मानले व कार्यक्रमात केलेल्या ठळक सूचनांबद्दल अवश्य विचार करू असे आश्वासन दिले.

यानंतर अध्यक्ष डॉ. कापडी साहेब यांचे अध्यक्षीय भाषण झाले. त्यांनी हेमाडपंतांचे श्रीसाईसच्चरित हा विषय घेतला होता. त्यांचे भाषण असे–

कै. ह. भ. प. गोविंदराव रघुनाथराव दाभोळकर उर्फ अण्णासाहेब यांचा साई सच्चरित्र हा ग्रंथ आहे. त्याचे पूज्यभावाने नमन करून मी समारोपाचे हे भाषण करीत आहे. आण्णासाहेबांना हा ग्रंथ लिहीण्याची साईबाबांकडून परवानगी मिळाली ही सुद्धा अद्भूतलीला आहे कारण भक्तलीलामृत आणि संतलीलामृत या दोन ग्रंथाने

प्रसिद्धी पावलेले श्रीमान महिपती यांनी पूर्वीच्या साधुसंतांची त्रोटक चरित्रे लिहिली आहेत तशी अर्वाचिन साधुसंतांची संक्षिप्त चरित्रे दासगणूमहाराजांनी लिहून प्रसिद्धी मिळविली भक्तलीलामृत, श्रीसंतलीलामृत व भक्तीसागरामृत हेच ते तीन ग्रंथ! शिवाय श्रीसाईबाबांच्या चरित्रावर तीन अध्याय लिहिले ते वेगळे यामुळे साईबाबांवर सच्चरित्र लिहिण्याचा मान त्यांनाच मिळेल असा सार्वत्रिक कयास होता.

पण साईबाबांची तऱ्हाच न्यारी आण्णासाहेबांच्या प्रथम भेटीतच त्यांचा उपनिषदावरील व्यासंग, त्यांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व, परमार्थाची ओढ साईबाबांनी अंर्तज्ञानाने तावडतोब ओळखले होते म्हणून बाबांचे सच्चरित्र लिहावे, अशी आण्णासाहेबांच्या मनात आलेली उर्मी माधवराव देशपांडे उर्फ बाबांचा ‘ शामा ’ यांच्याकडे त्यांनी प्रदर्शित केली. माधवरावांनी ती गोष्ट बाबांजवळ काढली. बाबा म्हणाले, ‘ अरे! माझ्यासारख्या फकीराचे चरित्र लिहून काय फायदा? तुमची इच्छाच असेल तर ठेवा दप्तर ’ दप्तर म्हणजे घडलेल्या गोष्टींचा संग्रह!’ ही आज्ञाच समजून आण्णा साहेबांनी ग्रंथ लिहिण्यास सुरूवात करून साईलीलेच्या प्रत्येक महिन्याच्या अंकात छापूनही येऊ लागली. खरे म्हणजे आण्णासाहेब जज्ज असताना साधुसंतांकडे कधीही धावत गेले नाहीत ही त्यांची प्रवृत्तीच नव्हती. परतु नानासाहेब चांदोरकर यांच्या आग्रहास्तव ते शिर्डीला आले, व गहू दळताना बाबांना पाहून त्यांची दृष्टी उजळली. दृष्टादृष्ट होताच ते बाबांच्यापुढे विनम्र—नतमस्तक झाले. साठ्यांच्या वाड्यात इतरांबरोबर त्यांचे वादविवाद होऊ लागले.

उद्धरे दात्मानाऽत्मान नात्मानमवसादयेत!
आत्मेन ह्यात्मन बंधुरात्मैव रिपुरात्मनः

मनुष्याने स्वतःने स्वतःचाच उद्धार करावा. आपला आपण नाश करू नये. कारण आपणच आपला शत्रू होय. ‘ असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी ’ असे म्हणू नये. ही वृत्ती आपलोच घात करते. असा उत्तर पक्ष घेऊन आण्णासाहेब जोर जोराने वादात शिरले.

दुसऱ्या दिवशी सकाळी आण्णासाहेब जेव्हा साईदर्शनाला गेले तेव्हा त्यांच्या स्वभावातील दंभ घालविण्याकरिता बाबा म्हणाले, ‘ रात्री कसला वादविवाद चालला होता? हे हेमाडपन्त काय म्हणत होते?

वादावादी नाही बरी। नको कुणाची बरोबरी।
नसता श्रद्धा आणि सबुरी। परमार्थ तीळभरी साधेना।

बाबांच्या तोंडचे हे शब्द ऐकून आण्णासाहेब खजिल झाले. तेव्हापासून वाद-विवाद सोडला. बाबांना आपला वादविवाद कसा कळला? वादविवादात भाग घेत-लेली सर्व मंडळी तर आपल्याबरोबरच. मशीद आणि साठ्यांचा वाडा यातले अंतर तर चांगले ऐकू न जाण्याइतके दूर! बाबांच्या अंतर्ज्ञानाची खात्री पटली. पुनः आपल्या ज्ञानाची घमेंड मारली नाही. उलट बाबांनी ठेवलेले हेमाडपन्त हेच नाव धारण करून सच्चरित्रातील प्रत्येक अध्यायाच्या शेवटी 'भक्त हेमाडपन्त विरचिते' ही बिरुदावली लावली.

मी अनेक संतांची चरित्रे वाचली, अभ्यासली परंतु ह्या ग्रंथाइतका मराठीत सुबोध, प्रासादिक आणि रसाळ ग्रंथ मला आढळला नाही.

रामदास स्वामी म्हणतात--

जेणे परमार्थ वाढे । अंगी अनुताप चढे ।
भक्ती साधन आवडे । त्या नाव ग्रंथ ।। १ ।।
जेणे होय उपरती । अवगुण पालटती ।
जेणे चुके अधोगती । त्या नाव ग्रंथ ।। २ ।।
जेणे परम साधन । जेणे ग्रंथ होय ज्ञान ।
जेणे होईजे पावन । त्या नाव ग्रंथ ।। ३ ।।

स्वामी समर्थ रामदासांच्या काव्योपंक्तीप्रमाणे हुबेहूब सर्व ज्ञानाची, उपदेशाची लक्षणे ज्यात आहेत असा हा साई सच्चरित्र ग्रंथ आहे.

तीनशे वर्षानंतर समर्थ रामदास स्वामीच साईबाबांच्या रूपाने अवनीवर उतरले आहेत असे म्हणतात, ते काही खोटे नाही.

तसेच साईसच्चरित्र ग्रंथात प्राचीन व अर्वाचीन मानवी स्वभावाची बरी-वाईट सर्व दृश्ये व्यासांच्या महाभारताप्रमाणे त्यांनी सोडलेली नाही. असे बारकाईने अनुसं-धान राखून जर हा ग्रंथ वाचला तर आढळून येईल. श्री. भगवान व्यासाला 'व्यासो-च्छिष्टमजगत् सर्वम' असे म्हटले जाते.

काही अध्यायात बनता बनेल, पत्नीपतन--पत्नीवचन, हरी का बेटा जरीका फेटा आईचा मुका घ्यायला काय हरकत आहे. 'वाहवा! नवरदेवच की सजलास'

वगैरे सारख्या बारीक-सारीक गोष्टीत सुद्धा किती खोलवर बोध सुचविला आहे बरे! साईबाबांनी हात धरून हा ग्रंथ लिहून घेतला असे हेमाडपंत म्हणतात. ते अक्षरशः दृष्टोत्पत्तीस येते.

आण्णासाहेबांना सर्व वेदवेदांगे, पुराणे, उपनिषदे हे धार्मिक ग्रंथ तोंडपाठ असावेत. 'क्षय माया ब्रह्म' अथर्ववेदाचे महावाक्य 'अहं ब्रम्हास्मि' यजुर्वेदाचे महावाक्य, प्रज्ञानमान (ऋग्वेद) ऐकेन ज्ञानेन सर्वंहि सर्व खल्विदं ब्रह्म–ब्रम्हाअहं-स्मिती- पुरापिनव असे मति साः गर्ति.

वरील सारखी संस्कृत प्रचूर वाक्ये साईसच्चरित्र ग्रंथात ठिकठिकाणी विखुर-लेली आहेत. यावरून संस्कृत भाषा आण्णासाहेबांच्या घरी पाणी भरत असावी असा संभ्रम होतो.

नामदेवांनी ज्ञानेश्वरीबद्दल म्हटले आहे की ममक्षूतेने ज्ञानेश्वरीस दररोज एकतरी ओवी अनुभवावी तसेच साईबाबांच्या कृपेने व प्रेरणेने लिहिलेल्या ह्या ग्रंथातील एक. तरी अध्याय किंवा अध्यायाचा काही भाग साईभक्तांनी दररोज अभ्यासावा असे माझे या प्रसंगी सांगणे आहे.

साईनाथ गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायी.

अध्यक्षांच्या भाषणानंतर डॉ. कापडी यांचा संस्थानतर्फे शाल, घालून पुष्पहार व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर माजी अध्यक्षा सौ. सरोजिनीताई मुळ्ये, श्री. नानासाहेब रासने यांची छोटीशी आशिर्वादात्मक भाषणे झाली.त्यानंतर डॉ. श्री. दि. परचुरे यांनी आभार प्रदर्शनाचे भाषण केले. संस्थानतर्फे आभार प्रदर्शनाचे भाषण श्री. द. चिं पाठकसाहेब यांनी केले. यानंतर पुरुष लेखक–कवीच्या तर्फे श्री. नागेशराव भोगलाईकर यांनी सर्वांचे मनापासून आभार मानले. स्त्री–लेखक कवींच्या तर्फे सौ. सुशिलाबाई हजारे यांनी आभार प्रदर्शित केले. गेली ३–४ वर्षे संमेलनाला त्यांची अनुपस्थिती जाणवली होती. यानंतर शिरडीचे श्री. बाप्पाजी रत्नपारखी यांचेही बाबांनी त्यांना दिलेल्या चार आणेलींवर छोटेसे भाषण झाले. ह्यांनी बाबांचे दर्शन घेतलेले आहे.

सर्व लेखक–कवींचा संस्थानतर्फे पुष्पहार, श्रीफल, बाबांचा प्रसाद एक अभंग पुस्तिका, पंचरंगी बाबांचे सुरेख छायाचित्र व बाबांचे एक सुंदर कॅलेंडर अशा वस्तू देऊन सत्कार करण्यात आला. बाबांचे कॅलेंडर दिल्लीचे साईभक्त व तेथील श्रीसाई मंदिराचे चालक–मालक श्री. आर. एस. चिटणीस यांनी मुद्दाम भेटीदाखल पाठवि-लेली होती.

या खेपेस थोडासा उशीरच झाला होता. शेवटी श्री. नागेश मोगलाईकर यांचे निरोपगीत श्री. सालर्डेकर यांनी गाईले व हा ९ व्या संमेलनाचा कार्यक्रम समाप्त झाला. संकष्टी असल्यामुळे रात्री ९–१५ वा. सुद्धा भोजन गृह मुद्दाम उघडे ठेवण्यात येऊन संमेलनाला आलेल्या पाहुण्यामंडळींना भोजन प्रसाद वाढण्यात आला दरबारात कवी मंडळींनी हजेरी रात्री १० वाजेपर्यंत लावली व शेजारती नंतर संपूर्ण कार्यक्रम संपले.

☆



[ श्रीसाईबाबांच्या रौप्य पादुकांची मिरवणूक मद्रास येथील ए. आय. एस. इस च्या कार्यालयातून निघाली त्या प्रसंगीचे चित्र. पालखीसमोर डॉ. श्री. दि. परचुरे व श्री. सदानंद चेंदवणकर दिसत असून त्यांचे शेजारीच समाजाचे अध्यक्ष श्री. टी. केशवराव व चिटणीस श्री. विश्वनाथन हे दिसत आहेत

मद्रास येथे झालेले

# श्री साईबाबांच्या पादुकांचे स्वागत

● दक्षिण भारतात नेल्लूर येथे भरविण्यात आलेल्या २० व्या ऑल इंडिया शिर्डी साई डिव्होटी कनव्हेंशन प्रसंगी श्रीसाईबाबांच्या चांदीच्या पादुका भक्तांच्या दर्शनासाठी मुद्दाम नेण्यात आल्या होत्या. ता. ७, ८ व ९ जानेवारी १९८३ हे तीन अधिवेशनाचे दिवस तिथे पादुकांच्या दर्शनासाठी देण्यात आले होते. अधिवेशन संपल्यावर त्या पादुका मद्रास येथे ऑल इंडिया श्री साईसमाजाच्या मुख्य कार्यालयात व प्रचंड अशा श्रीसाई मंदिरात नेण्यात आल्या.

ता. १० जानेवारीस सकाळी ६–२० वाजता नेल्लूरहून मद्रास येथे जाणाऱ्या गाडीतून या पादुका नेण्यात आल्या. दुपारी ठीक १२ वा. पादुका मद्रासच्या मैलापूर या भर वस्तीतील ए. आय. एस. एस. च्या कार्यालयात व साईमंदिरात सन्मानाने नेण्यात येऊन त्यांची स्थापना करण्यात आली. पादुकांची षोडषोपचारे पूजाअर्चा, करण्यात येऊन त्या भक्तांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आल्या.

दुसऱ्या दिवशी सायं. ८ वा. या पादुकांची मद्रास मैलापूर ते श्री कपालेश्वर मंदिर परिसर अशी वर्तुळाकार वाजत–गाजत प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. फुलांनी सुशोभित केलेल्या पालखीत श्रीसाईबाबांची प्रचंड तसबिर व या पादुका स्थानापन्न करण्यात आल्या होत्या. वाजत गाजत श्रीसाईबाबांच्या नावाचा जयघोष करीत निघालेल्या या मिरवणुकीला घराघरातून प्रतिसाद मिळाला व भाविक स्त्री–पुरुषांनी बाबांच्या या पादुकांचे पुष्पहार घालून मनोभावे दर्शन घेतले. याच सुमारास दक्षिणेत पोंगल या सणाला सुरवात झाली होती त्यामुळे पादुका दर्शनाला विशेष गर्दी झाली. रात्री ११ वा. मिरवणूक मंदिरात परतली.

ता. १२ रोजी सायं. ६ वाजता ए. आय. एस. एस. च्या कार्यालयात–मंदिरात डॉ. परचुरे व श्री. सदानंद चेंदवणकर यांच्या भाषणांचे कार्यक्रम झाल्यावर सभ्याचे अध्यक्ष श्री. टी. केशवराव यांनी त्या उभयतांचा महावस्त्र देऊन सत्कार केला त्याच रात्री १० वाजताच्या मद्रास–मुंबई मेलने पादुका मुंबईला निघाल्या व त्या १४ तारखेला पहाटे मुंबईस व त्याच दिवशी रात्री शिर्डीस निघाल्या व १५ तारखेस श्री बाबांच्या दरबारात सुखरूप जाऊन पोचल्या. मद्रास येथे श्रीबाबांच्या पादुकांचा एकंदरीत सारा सोहळा अक्षरशः नेत्रदीपक असाच होता. श्रीबाबांच्या पादुका नेल्लूर व मद्रास येथे नेण्यासाठी म्हणून मुम्बईचे सुप्रसिद्ध साईभक्त श्री. जी. आर. इनामदार यांनी श्रीसाईबाबा संस्थानशी प्रयत्न केले होते व ते यशस्वी झाले.

# 'प्रगटे मस्जिद में साई भगवान !'

श्री. रघुनाथराव शं. जुन्नरकर यांच्या श्री साईबाबांच्या जीवनावरील मूळ मराठी व इंग्रजी कादंबरीचा हा हिन्दी अनुवाद दसऱ्याच्या सुमहूर्तावर प्रसिद्ध झाला आहे. अनुवादक आहेत प्रा. आद्याप्रसाद त्रिपाठी. मूळ मराठी कादंबरीच्‍हृदयाचा इतकी ठाव घेणारी आहे की कोणत्याही भाषेत तिचे रूपांतर हे केवळ पुस्तकाचे वेष्टण बदलण्यासारखे आहे. मराठी भाषिकांनी ती वाचली तरी हिन्दी भाषेची जाणीवही न होता स्वभाषेच्या आत्मीयतेने तो बाबांचे हे सुरम्य, संघटीत व सुसंगत चरित्र सरसर वाचत जातो आणि बाह्य सृष्टीच्या संपूर्ण विस्मृतीत तो आत्मसाक्षात्काराच्या अपूर्व आनंदाची अनुभूति मिळवून घेतो हे मात्र खास !

पुस्तकाची छपाई व साज पूर्वीच्या दोन्ही पुस्तकाप्रमाणे सुंदर झाली आहे. हिन्दी पुस्तकाचे वैशिष्ठ्य म्हणजेच श्रीबाबांचा सुरुवातीलाच घालण्यात आलेला सुंदर, सुबक छोटासा रंगीत फोटो व छापण्यात आलेली साईअवतार विषयक **जुन्नरकरांची हिन्दी कविता** सध्याच्या महर्गततेच्या अनुसंधाने पुस्तकाची रु. ४५/– ही किंमत अतियोग्य आहे असे आम्हाला वाटते. वर्षाच्या आत फाटून जाणाऱ्या शर्टलाही आजकाल साठ सत्तर रुपये मोजावे लागतात. जन्मभर टिकून अध्यात्म्याचा अतीव आनंद देणारा हा ग्रंथ पुन्हा पुन्हा वाचावासा वाटतो व चैनीवर शेकडो रुपये बरबाद करणाऱ्या वाचकाला ४५ रुपयांच्या अल्प किंमतीत अति काही देऊन जातो. वाचनाचा, भक्तीचा अद्‌भूत आनंद देतो.

या पुस्तकाबद्दल आम्ही यापूर्वी दोनदा लिहिले असूनही पुन्हा पुन्हा याची प्रशंसा केल्यावाचून राहवत नाही. साईजीवन इतके सुसंगत व सुंदर कथन शैलीत प्रस्तुत केलेला हा एकमेव ग्रंथ असून कोणत्याही भाषिकाने आपल्या राष्ट्रीय भाषेतील ही चरित्रसंपदा ४५ रुपये खर्च करून अवश्य संग्रही ठेवावी अशी आमची प्रामाणिक शिफारस आहे.

प्रा. आद्याप्रसाद त्रिपाठी यांचीही भाषा मूळ मराठी व इंग्रजी पुस्तकाइतकीच ओजस्वी व ओघवती आहे. साध्यासुध्या शब्दातून सर्व काही सांगून जाणारी आहे. शिक्षित अशिक्षितांना, आबाल वृद्धांना, हिन्दी नसणाऱ्या भाषिकानाही ती सहज समजते आणि त्यामुळेच रसहानी न होता मुग्ध झालेला वाचक अध्यात्माच्या उच्च शिखरावर नकळत जाऊन पोहोचतो.

---

**'प्रगटे मस्जिद में साई भगवान !' मूल्य रु. ४५/–**

प्रकाशक : प्रशांती प्रकाशन, ५, वसंत अपार्टमेंटस, कस्तूर पार्क, शिंपोली रोड, बोरीवली ( पश्चिम ), मुंबई, ४०००९२.

# साईबाबांच्या उदीचे अनुभव

–श्री. बळवंत दाजीबा वर्तक
मु. पो. शिरगांव
ता. पालघर जि. ठाणे

● श्रीसाईबाबा हयात असताना १९१४ साली आमचे वडील कै. दाजीबा पांडुरंग वर्तक, मु. पो. शिरगांव हे शिर्डीस गेले होते. त्यावेळी श्रीबाबांच्या हस्ते जी उदी मिळाली होती ती आजपर्यंत राखून ठेवली आहे. तिचा परोपकारी उपयोग वेळोवेळी होतो. त्यासंबंधी थोडीशी माहिती देत आहे.

* १९६० साली आमचे गावातील एक बाई बाळंतपणाकरिता अडली होती. मी काही कामानिमित्त तेथे गेलो. 'सर्व उपाय करून झाले आता दैवावर भार टाकून बसलो आहोत.' असे गर्दीतील दुसऱ्या एका बाईने मला सांगितले. मी घरी येऊन श्रीबाबांनी दिलेल्या उदीपैकी चिमूटभर उदी घेऊन गेलो. सदर बाईच्या कपाळास लावून थोडी उदी तोंडात टाकण्यास सांगितले. तसेच साई ॐ हरी ॐ हा मंत्र म्हणण्यास सांगितले. साधारण पाच मिनिटात बाईची सुखरूप सुटका झाली. सर्वांना नवल वाटले. हा प्रयोग श्रीबाबांच्या कृपेचा होता.

* १९७३ सालची गोष्ट. आमचे शेजारी एक पेन्शनर शिक्षक श्री. भास्कर आबा वर्तक यांना भुताटकीचा त्रास झाला होता. बरेच प्रयत्न करूनही उपयोग झाला नाही. आजाराच्या तिसरे दिवशी तर त्यांनी डोळे फिरविले. सगळी मंडळी घाबरली. भाऊ बायको व मुले तर रडायला लागली. मी तेथेच होतो. घरी जाऊन तावडतोब चिमूटभर उदी घेऊन आलो. माझ्या हाताने त्यांच्या कपाळास लावली व थोडी तोंडात टाकली. त्यांच्या मस्तकावर हात फिरवीत 'साई ॐ हरि ॐ' हा मंत्र जपत राहिलो. थोड्या वेळात ते डोळे उघडून इकडे तिकडे पाहू लागले. असा हा अनुभव श्री बाबांच्या उदीचा आहे.

* आमचे वाडीत राखणदारी करणारा संकरीत जातीचा कुत्रा १९७५ साली अचानक आजारी झाला. त्याच्या तोंडातून फेस येत होता. पाय आपटून तो गरगरा फिरू लागला. आमचा पुतण्या चि. राजेन्द्र धावत माझ्याकडे आला. रडकुंडीस येऊन त्याने कुत्र्याची परिस्थिती मला सांगितली. मी त्याला घरी पाठवून उदी मागविली.

मस्तकास लावून थोडी उदी कुत्र्याच्या तोंडात टाकली. त्याच्या डोक्यावर हात फिर. वित मी 'साई ॐ हरि ॐ' हा मंत्र म्हणत बसलो. थोड्या वेळातच कुत्रा उठून बसला ही श्रीबाबांचीच कृपा होय.

आमच्या गावाजवळ माहीम हे गाव आहे. तेथील एक मोठे बागाईतदार श्री. शंकर शिणवार म्हात्रे यांची आई श्रीमती गंगाबाई वय वर्षे ८०, यांना मधून मधून मानसिक त्रास होई. १९७० साली तसाच त्रास झाला असता त्यांच्या मुलाने मला सांगितले. मी श्रीबाबांची उदी घेऊन माहीम येथे गेलो. ती कपाळास लावून थोडी पाण्यातून पिण्यास दिली. 'साई ॐ हरी ॐ' हा मंत्र म्हणण्यास सांगितले. त्यावेळी त्यांना बरे वाटले. तेव्हापासून मरेपर्यंत तसा त्रास कधीही झाला नाही. काय हा उदीचा प्रभाव.

आमच्या गावातील सोनार श्री. शांताराम शेट, यांचा मुलगा चि. सुरेश चार महिने आजारी होता. हॉस्पिटलमधून घरी आणले. तरी रोज ताप चढायचा. खूप अशक्तपणा आला होता. ६ मे १९८२ रोजी त्याच्या लग्नाचा मुहूर्त होता. उभे रहाण्याचीही ताकद नव्हती. आदल्या दिवशी मी थोडी उदी त्याच्या आईस दिली. कपाळास लावून थोडी त्याला पाण्यातून देण्यास सांगितले. 'साई ॐ हरि ॐ' मंत्र म्हणण्यास सांगितले. त्या दिवशी त्याचा ताप चढला नाही. तब्येत ठीक झाली. लग्न ही पार पडले. असा हा उदीचा महिमा.

असे कितीतरी अनुभव आहेत. श्रीबाबांच्या उदीचा असाच परोपकार घडाव ही त्यांच्या पायाशी मागणी आहे.

आमच्या गावातील श्री. भालचंद्र सखाराम वर्तक, श्री. दशरथ मंगळया राऊत व श्री. तुकाराम खंडूजी पाटील या तिघाना तीन– तीन मुली होत्या. मुलगा नाही म्हणून ते नाराज होते. त्यांना उदी लावून श्रीसाईबाबांचे नामस्मरण करण्यास सांगितले. आता त्या तिघांच्याही बायकांना मुलगे झाले आहेत. ते शिर्डीस जाणार आहेत.

उदी व साई ॐ हरी ॐ नामस्मरणात किती, शक्ती आहे याचा प्रत्येकाने जरूर अनुभव घ्यावा.

श्री साईनाथ महाराज की जय

# बाबांची विभूती

–कु. माया ओ. बी.
एस. एस. कॉलनी, ( आं. प्र. )

● श्रीसाईबाबांची 'विभूती' ही तीनच अक्षरे पण ह्या मौल्यवान अक्षरात साऱ्या जगातले विज्ञान सामावले आहे. साधा रोग असो वा कॅन्सरसारखा भयानक रोग असो. ज्यांनी ज्यांनी श्रद्धेने श्रीबाबांची विभूती भक्षण केली वा कपाळी लावली त्यांचे सारे रोग क्षणातच दूर पळाले आहेत. ह्याबद्दल अनेक लेख श्रीसाईलीला मासिकात पूर्वीही आलेले आहेतच. श्री बाबांचे नामस्मरण व त्यांच्या विभूतीची महती काही औरच आहे. खरं म्हणजे हा लेख मी एक वर्षापूर्वीच द्यायला हवा होता परंतु अंगातील आळसामुळे म्हणा अगर काही कारणामुळे तो तसाच राहिला.

तो दिवस मला आठवतो, अगदी बेचैन अवस्थेत घालविलेले ते दिवस. आमची 'बिलू' ( मांजर. जिच्यावर आम्ही लहान मुलासारखे प्रेम करतो. ) अचानक टेबलाला आपटली व दुसऱ्या दिवसापासून तिच्या तोंडावर सूज येऊन कानातून पू वाहू लागला. बरीच औषधे झाली बरेच पैसे खर्च केले परंतु गुण येईना. तिचे हाल तर पाहावत नव्हते. असाच विचार करीत असता श्रीबाबांच्या फोटोकडे लक्ष गेले नि धावत जाऊन बाबांचे पाय धरले. मनात म्हटले 'बाबा तुमच्या विभूतीने बिलू बरी झाली तर हा लेख मी श्री साईलीला मासिकात पाठवीन.' विभूती बिलूच्या कानात घातली नि आश्चर्य अगदी क्षणातच बिलूच्या कानातून येणारा पू वाहायचा थांबला. जिच्यासाठी आम्ही २ महिने पाण्यासारखा पैसा खर्च करीत होतो तिला काही क्षणातच अगदी एकदाच विभूती घालून बरे वाटले. काय हा चमत्कार बाबांच्या विभूतीचा. नंतर काही कारणामुळे लेख लिहायचा राहिलाच पण त्याचे परिणाम ! आता बिलू पुन्हा आजारी पडली नि श्रीबाबांनी पुन्हा मला लेखाची आठवण करून दिली. आता हा लेख लिहून श्री बाबांकडे माफी मागून तिला पुन्हा बरे करण्याची त्यांच्या चरणी कळकळीची विनंती करीत आहे.

जेव्हा जेव्हा आम्ही श्री बाबांना साद घातली. बाबांनी प्रत्येकवेळी आम्हाला. ओ दिली आहे.

अशा माझ्या प्रेमळ बाबांना कोटी कोटी प्रणाम !

# बाबांची उदी म्हणजे एक महान गुणकारी औषध

—श्री. सतीश अ. रेगे, अंधेरी

● सन १९८२ डिसेम्बर महिन्यात मी माझे मामा आणि मामी बाबांच्या दर्शनाला गेलो होतो. बाबांच्या आशिर्वादाने शिर्डीचे सगळे कार्यक्रम सुखकर झाले. शिर्डीहून मुंबईला आल्यावर मला फारच कफ झाला व खोकलासुद्धा सतत यायचा. मी कफ आणि खोकल्याने ग्रासलो. माझे वडीलबंधू आणि त्यांच्या पत्नी म्हणजे माझी वहिनी दोघेही डॉक्टर, त्यांनी मला औषध सुरू केले सध्या मुंबईत खोकल्याची फारच साथ सुरू झालेली आहे. माझ्या बंधूने दिलेल्या गोळ्या मी घेत असे परंतु त्याबरोबर एक महान गुणकारी औषध घेत असे, व ती म्हणजे साईबाबांची उदी. ती मी पाण्यातून घेत असे. गोळ्या घेतल्यामुळे मला एक प्रकारचा अशक्तपणा आला. माझ्या डॉक्टरबंधूने गोळ्या घेणे बंद करण्यास सांगितले व रक्त तपासण्यास मला पाठविले. मी थोडासा घाबरलो परंतु उदी पाण्यातून घेण्याचे चालूच होते. परंतु रक्ताचा जो रिपोर्ट आला तोसुद्धा श्रीबाबांच्या कृपेने नॉर्मल. आता तर माझा खोकला बराच कमी झाला आहे. श्री साईबाबांची उदी आमच्या घरी म्हणजे काही झाले तरी ती प्रथम पाण्यातून आम्ही घेतो, आणि नंतर मग औषध चालू करतो. श्रद्धा आणि सबुरीची शिकवण दिलेल्या श्रीसाईंनी आपल्या उदीचा महिमा अजूनही तसाच ठेवलेला आहे या उदीमध्ये एक प्रकारची जादू आहे. ह्या उदीमध्ये एक प्रकारचे योगसामर्थ्य आहे.

## कुमारी उज्ज्वला बर्गेचे निधन

पॉप्युलर प्रि. इन्डस्ट्रीज शिवडी येथील श्रीसाईलीलाचा कंपोज उभा करणाऱ्या एक कुशल साईभक्त कर्मचारी सौ. उर्मिला दामोदर बर्गे यांची एकुलती एक कन्या चि. उज्ज्वला वय अवघे ५ वर्षे हिचे गोवराचे आजाराने सोमवार ता. १४–२–८३ रोजी शहाड येथे निधन झाले.

श्रीसाई बालमृतात्म्यास चिरशांती व सद्गती देवो.

# साईबाबांचा कृपाप्रसाद

-सौ. गानला
लक्ष्मीनारायण लेन, अकूलवाडी, माटुंगा, मुं. १९

● इ. स. १९७१ पासून म्हणजे जवळ जवळ ११ वर्षे होत आली. मनात तीव्र इच्छा असून देखील माझी लेखणी हा लेख लिहिण्यास उस्फूर्त झाली नाही. परंतु आज श्री बाबांच्या इच्छेनुसार अंतःस्फूर्ति प्रेरित होऊन माझी लेखणी पुढे सरसावीत आहे.

माझा इतिहास फार मोठा आहे. मी आज वय वर्षे ६८ असून मला नऊ नात बंडे आहेत. माझ्या धाकट्या मुलीच्या लग्नानंतर ता. २४ आक्टोबर १९७१ रोजी माझा सर्व परिवार म्हणजे तीन मुले, दोघी सुना, दोघी मुली, जावई, माझी आई, आम्ही उभयता व पाच नातबंडे असे सर्व शिर्डीस श्रीबाबांच्या दर्शनास गेलो होतो. ता. २४ रोजीच अभिषेक वगैरे सकाळीच आटोपून दुपारची आरती करून दुपारी २च्या एस. टी. ने परतणार होतो. दिवाळीची सुट्टी असल्यामुळे श्री बाबांच्या दर्शनास अलोट गर्दी होती. त्यामुळे आरती दुपारी १२॥ ला न होता १॥ वाजता होणार असल्याचे कळले. आम्हास २ ची एस. टी. धरावयाची असल्याने आधी संस्थानच्या खानावळीत प्रसादाचे जेवण जेवून मग आरती करून तावडतोब निघू या विचाराने आम्ही सर्व संस्थानच्या खानावळीकडे वळलो. माझा मोठा मुलगा जेवणाची तिकीटे काढू लागला व आम्ही सर्वजण पुढे जाऊ लागलो. इतक्यात माझी चार वर्षाची नात आनंदाने उड्या मारत पुढे जाऊ लागली असता, तेथे अगदी मोठ्या तापविलेल्या दुधाच्या भांड्यात (केव्हाच शेगडीवरुन उतरुन ठेवलेले असावे) धक्का लागून पडली. क्षणार्धात होळ्यापुढे काजवेच चमकले. आम्ही जवळच असल्याने पटकन तिला बाहेर काढून आता काय करायचे म्हणून धावतच माझा मोठा मुलगा तिला उचलून बाहेर आणताच माझ्या बाबांच्या कृपेने तेथेच एक जीप गाडी उभी होती त्यात तिला घेऊन बाबांच्या कृपेने संस्थानच्या हॉस्पिटलमध्ये गेलो. तेथे पूज्य डॉ. पिंटो व (तथापी आम्हास देवासमान वाटणारे डॉक्टर) डॉ. देशपांडे आले होते. त्यांच्या मतानुसार छातीपर्यंत जवळ जवळ भाजलेला पेशंट तीन दिवसपर्यंत शॉक-मध्ये असल्यामुळे तोपर्यंत काहीच करू शकत नव्हते. मी अत्यंत घाबरले व मोठ्या मुलास म्हणाले, स्पेशल टॅक्सी करून पुण्यास माझे दीर डॉ. व्ही. जी. गानला एम. डी. हे ससून हॉस्पिटलमध्ये डीन होते त्यावेळी तिकडे घेऊन जाऊ तेव्हा मुलगा

म्हणाला, ' मम्मी, हलविता येत नाही, तरी श्री बाबांची कृपा व आपले नशिब समजून राहू या. '

आम्ही एका दिवसात परतणार परंतु जवळ जवळ १ महिना शिर्डीस राहिलो. श्रीबाबांची इच्छा, ता. २५ रोजी सकाळी ११॥ च्या सुमारास मुलीने डोळे फिरविले व केस संपेल असे डॉक्टरांना वाटू लागले. डॉ. पिंटो मात्र सतत जवळ उभे राहून निरीक्षण करत इंजेक्शन बदलून बदलून देत होते. आम्ही सर्वजण सतत बाबांचा धावा करीत होतो. बाबांवरची निष्ठा हाच एक शेवटचा उपाय असे डॉ. पिंटो म्हणाले. माझी म्हातारी आई हॉस्पिटल ते मंदीर अशा चकरा करत बाबांची उदी व तीर्थ आणून तिला देत होती. तो दिवस निभावला. ता. २६ ला परत सकाळी १०–११ च्या सुमारास तिला फिटस् येऊ लागल्या. श्रीबाबाच जणू डॉ. पिंटोच्या रूपाने धावून येऊन तेथे तिला सतत इलाज करीत होते. श्रीबाबांच्या कृपाप्रसादाने तीन दिवस निभावले व माझ्या नातीस जीवदान मिळाले व आम्ही महासंकटातून निभावलो.

नंतर चौथ्या दिवशी बाह्य उपचारास डॉक्टरांनी सुरवात केली. पाठ, पोट, छातीपर्यंत मुलगी पोळली होती. दोन वर्षापूर्वीच हॉस्पीटल चालू झाल्याने तितक्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. तेथे औषधे मिळत नव्हती. औषधे, लोशन्स, ऑईन्टमेन्टस, बॅंडेजस, लींट इत्यादी सर्व कोपरगावहून रोज मागवावी लागत असत. थंडीचे दिवस आणि आम्ही अगदी एका दिवसाच्या मुक्कामाच्या हिशेबाने कपडे घेतलेले. हॉस्पीटल नवीनच असल्याने चादरी पुरेशा नसल्याने मुलीच्या अंगाखाली आमच्या साड्या पसरून घालीत होतो. पंधरा दिवसानंतर डॉक्टरांनी मुंबईस जाण्याची परवानगी दिली. अर्धी मंडळी आठ दिवसात परत पाठवून मी, मुलीचे आई–वडील सकाळी नुसता चहा घेऊन रात्री श्रीबाबांची शेजआरती झाल्यानंतर हॉटेलात जे मिळेल ते खाऊन रहात होतो. डॉ. पिंटोनी मात्र खूपच त्रास घेतला. स्वतः जातीने ते माझ्या नातीकडे लक्ष पुरवीत असत. त्याचप्रमाणे सिस्टर मिसेस जगताप यांनी देखील तिचे ड्रेसिंग व्यवस्थित करून बाह्योपचाराची मनापासून काळजी घेतल्याने तिच्या अंगावर कोठेही व्रण राहिला नाही. परतण्याच्या दिवशी पहाटे डॉक्टरांच्या परवानगीने मी माझ्या नातीस कांकड आरतीस उचलून नेऊन तिच्या हातून बाबांच्या समाधीला चंदन लावून अभिषेक करून दुपारच्या बसने आम्ही मुंबईस घरी परतलो.

ही सर्व त्या दयाघन श्रीसाईबाबांची कृपाच नांही का ? तेव्हापासून दरवर्षी ता. २५ आक्टोबरला दिवाळी असो, दसरा असो परंतु आम्ही सर्व शिर्डीस जाऊन

श्रीबाबांचे दर्शन करून अभिषेक करीत असतो. आता माझी नात १४ वर्षांची आहे. आम्ही दर महिन्यास श्रीसाईलीला घेत असतो व भक्तिभावाने वाचत असतो आम्ही श्री सद्गुरु साईनाथांच्या चरणांचे सदैव ऋणी असून दर गुरुवारी नित्यनेमाने आमच्या घरी श्रीबाबांची भक्तिभावाने आरती होत असते. मी डॉ. पिंटो तसेच सिस्टर जगताप ह्यांची सदैव ऋणी आहे.

★

॥ ॐ साई समर्थ ॥

साईभक्तांस कळविण्यास आनंद होत आहे की, सालाबाद प्रमाणे या वर्षीही 'साईसेवक मंडळ मुम्बई यांनी दि. २१ एप्रिल १९८३ रोजी होणाऱ्या रामनवमी उत्सवानिमित्त मुम्बई ते शिर्डी पदयात्रेने पालखी सोहळा आयोजीत केला आहे.

श्रीसाईची पालखी मंगळवार दि. १२ एप्रिल ८३ रोजी श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी मुम्बईचे कार्यालय 'साईनिकेतन' डॉ. आंबेडकर मार्ग दादर टी. टी. मुम्बई १४ येथून दुपारी १२ वा. ची मध्यान्ह आरती झाल्यानंतर निघेल, आणि ठाणे. भिवंडी, शहापूर, कसारा, इगतपूरी, नाशिक, सिन्नर बावी मार्गे श्रीक्षेत्र शिर्डी येथे मंगळवार दि. १९ एप्रिल ८३ रोजी पोहोचेल.

ज्या साईभक्तांस या पालखी सोहळयात सामील होण्याची इच्छा असेल त्यांनी कृपया मंडळाने आकारलेली वर्गणी रु. १२५/– दि. ३१–३–८३ रोजी वरील ठिकाणी दुपारी २ ते संध्याकाळी ५ या वेळात आणून द्यावी. यावेळी आमचा प्रतिनिधी कार्यालयात हजर राहिल.

वरील आकारण्यात आलेली वर्गणी ही फक्त मुम्बई ते शिर्डी येथे पोहचे पर्यंत लागणाऱ्या खर्चांपुरतीच मर्यादित राहील, आणि त्यानंतरचा खर्च प्रत्येकास वैयक्तिकरित्या करावा लागेल.

# तू माझा त्राता

—श्री. शंकर इनामदार
३६, शंकरपुरा पेठ, महाजन वाडा,
जुन्नर ( जि. पुणे ), ४१०५०२

● नुकतीच घडलेली गोष्ट. जूनच्या १५ तारखेला चेंबूरहून त्रोटक पत्र आलं. शेखर आजारी आहे. हॉस्पिटलमध्ये त्याला दाखल केलंय, तुम्ही तातडतोब या.

काळजात धस्स् झाले. पत्र चेंबूरच्याच माझ्या एका नातलगाने पाठवलेले, १२ तारखेचे. जुन्नरला १५ तारखेला दुपारी पोहचलेले. उठलो. आतल्या खोलीत सौभाग्यवती दुपारची वामकुक्षी घेत होती. तिला उठवले. ते पत्र वाचून दाखवले. आम्ही दोघेही सुन्न. बाबांच्या तसबिरीपुढे जाऊन उभा राहिलो. म्हणालो–

'बाबा, आमचा एकुलता एक कर्तासवरता मुलगा आहे. त्याला सुरक्षित ठेवा.' मनोमनी शरण गेलो. वळून पाहिले तर तिचेही डोळे तसबिरीवरच खिळलेले. हात जोडलेले, ओठांनी पुटपुट चाललेली.

'आपल्याला निघायला हवे. तावडतोब तयारी कर. तोवर मी पैसे काढून आणतो बँकेतून.'

'माझ्याजवळ दिडशे रुपये बाजूला ठेवलेले आहेत. तेवढे नाहीत पुरायचे ?'

'तसे २०/२५ माझ्याजवळ पण आहेत. पुष्कळ होतील. चल तर मग. वेळ नको घालवूस.'

बाहेर पडता पडता अडीच झाले. एस. टी. स्टॅण्ड घरापासून दहा मिनिटांच्या चालीच्या अंतरावर. जुन्नरहून ठाण्याला जाणारी गाडी उभीच होती. गाडीत जागाही भरपूर. प्रवासात डोक्यात तेच विचार. एकाएकी काय झाले असेल ? त्याची फिरतीची नोकरी. दगदग झाली असणार. फिरतीवर असताना वेगवेगळ्या ठिकाणचे अन्नपाणी, बदलती हवा. हॉस्पिटलमध्ये दाखल केलंय म्हणजे तसंच काहीतरी गंभीर स्वरुपाचे असणार. सूनबाईने तार का नाही केली ? तिलाही काही सुचले नसेल. घाबरून गेली असेल. गाडीच्या चाकाबरोबरच मनातले विचार गतिमान झालेले. भीतीप्रद विचार आले की ते खोडून टाकण्यासाठी बाबांची आठवण काढायची. हात जोडायचे. प्रार्थना करायची–

उभा पाठीशी तू असताना कसली मज चिंता ?

सद्गुरु तू माझा त्राता !

चेंबूरला पोहोचायला रात्रीचे दहा वाजले. घरात दोन्ही मुलांना सूनबाई झोपवीत असलेली. चेहरा म्लान–रडवेला–उदास झालेला.

'कुठे आहे शेखर ?' मी विचारलें.

'हॉस्पिटलमध्ये.'

'कोणत्या ?'

'इथेच. डॉ. वेलणकरांच्या.'

'काय होतय त्याला ?'

'गॅस्ट्रो. कालपासून बरं आहे. पण अंगात ताप आहे. परवा खूप होता. पाचच्यापुढे.'

'आता भेटता येईल त्याला ? भेटू देतील ?'

'देतील. ते खाजगी हॉस्पिटल आहे. स्पेशल रूम घेतलीय.'

'त्याच्याजवळ तिथे कोण आहे ?'

'पंत. त्यांनाच सांगितले होते तुम्हाला कळवायला.'

दोघेही आल्या पावलीच बाहेर पडलो. रिक्षा करून हॉस्पिटलमध्ये गेलो. शेखर जागाच होता. बाजूच्या कॉटवर पंत झोपले होते ते उठून बसले. आम्ही आल्याचे पाहून शेखरला धीर आल्यासारखा दिसला. मग त्याला बोलण्याचा त्रास नको म्हणून पंतांजवळच सारी चौकशी केली. डॉक्टरी परीक्षा अजून चालू असल्याचे समजले. रक्त तपासणीत किंचित दोष आढळला. टेंपरेचर नॉर्मलला आल्यावर एक्स–रे काढणार आहेत.

बाबांच्या उदीची एक पुडी सतत जवळ बाळगण्याचा मी रिवाज ठेवलाय. खिशातून मी पुडी काढली. उदी शेखरच्या कपाळी लावली. तोच हात अंगावर फिरवला. पुन्हा मनोमनी बाबांची प्रार्थना केली,

'उभा पाठीशी तू असताना कसली मज चिंता ?

सद्गुरु तू माझा त्राता !'

एक्स–रे काढल्यानंतर काम सोपे झाले. छोटासा पॅच दिसला. त्याला न्यूमोनियाचा पण त्रास सुरू झालेला होता. डॉक्टर हुशार आणि अनुभवी. योग्यत्या औषधोपचारांनी त्यांनी पेशंटला आठवडाभरात व्याधिमुक्त केले. डॉक्टरांच्या रूपाने स्वतः बाबाच मदतीला आलेले असणार!

आजार अथवा दुखणे खुपणे
असो कुणाचे काही देणे
भ्रांत कशाला त्याची करणे?
कृपाछत्र तव सदैव अमुच्या शिरावरी असता!
तू माझा त्राता!!

## प. पू. बशीरबाबा पैगंबर वासी

● जागतिक साई प्रचार सभेचे संस्थापक प. पू. श्री. बशिरबाबा शनि. ता. ९ जानेवारी १९८२ रोजी रात्री ८–३० वा. हैद्राबाद येथे अल्प आजाराने पैगंबरवासी झाले. ते आजारी होताच तेथल्या उस्मानिया रुग्णालयात त्यांचेवर उपचार चालू करण्यात आले होते. परंतु त्याचा काही एक उपयोग झाला नाही. निधन समयी बशीर बाबांचे वय अवघे ४० वर्षांचे होते.

१५ जुलै १९४२ रोजी वैकुंठ एकादशीचे दिवशी त्यांचा जन्म झाला. लहान पणापासूनच त्यांचा ओढा अध्यात्मिकतेकडे होता. ते शिर्डी साईबाबांचे परमभक्त होते. त्यांनी आपल्या ४० वर्षांच्या अल्प आयुष्यात वर्ल्ड साई प्रचार सभेची स्थापना केली. साई संदेश नावाचे श्रीबाबांच्या तत्व प्रणालीचा प्रचार प्रसार करणारे इंग्रजी मासिक काढून ते गेली १५ वर्षे त्याचे संपादक होते. आंध्र प्रदेशात कडाप्पा जिल्ह्यात प्रोडाट्टूर तालुक्यात श्रीरामसाई नगराची व तिथेच श्रीरामसाई मंदिराची त्यांनी उभारणी केली. आपल्या वाणीने त्यांनी असंख्य भाविक जनतेला श्रीसाईबाबांचा तत्वज्ञानाचा परिचय करून देऊन त्यांना साईभक्त बनविले त्यांच्या निधनाने एक थोर साईभक्त सत् पुरुष सद्गुरु कायमचा दृष्टी आड झाला आहे.

# साईबाबांची उदी व आनंदबाबांचे कार्य

—डॉ. अ. का. पाठक
पाठकवाडी, गोरेगाव

● श्री. आनंदराव तावडेंचे आनंदबाबा झाले. डे. पोलिस कमिशनर तावडेंचे सुपुत्र आनंदराव हे चांदीचा चमचा बाळपणापासून वापरणारे गृहस्थ होते. पोलिस ऑफिसर, लष्कराचे ऑफिसर व वकिली करताना आनंदराव अचानक आनंदबाबा झाले. मित्राकडील पार्टीच्यावेळी श्री साईबाबांचा फोटो पाहून 'दगडावरील हा कोण?' असा प्रश्न विचारून श्रीसाईबाबांचा परिचय त्यांना घडला. पण पुढे ते साईमय झाले. शिर्डीत श्री साईनगरीत श्री साईचा प्रेमवेडा म्हणून काही काळ त्यांनी घालवला. मोटरमधून फिरणारा आनंद शिर्डीत भक्तिभिखारी म्हणून फिरला. सत्संग लाभला. आता भक्तिवेडा संत झाला. पुनर्जन्म झाला. कर्नाटकात त्यांनी पहिले साई मंदिर बांधले. मुंबईत अमर ट्रॉम्बे व्हिलेज साईमय करून तेथे साईमंदिर निर्माण केले. हा सर्व प्रताप शिर्डीच्या उदीचा आहे.

'ओम साई' म्हणून ते उदी देतात त्याने अनेक साईमय झाले. श्री. कोठारे नावाचे गृहस्थांना भयगंडाने पछाडले होते. अनामिक भयाचा पगडा त्यांच्यावर होता. सर्व उपाय थकले. आनंदबाबांकडे आले. उदी देऊन विश्वास निर्माण केला. कोठारे यांचे भय कमी झाले. 'ओम साई' व उदीचा हा परिणाम आहे.

श्री. रेडकर नामक भक्तास बँकेत प्रमोशन नव्हते किंबहुना त्रासच होत असे. प्रमोशन लिस्ट तयार झाले. ऑर्डर्स निघाल्या. पण श्री. रेडकरांचे नाव नव्हते. रेडकर हवालदिल झाले. आनंदबाबांनी बाबांची उदी दिली व म्हटले की एक काय २ प्रमोशन घे. आश्चर्य म्हणजे रेडकरांना एक आठवड्यात प्रमोशन मिळाले.

कोणी एक समेळ नावाचे भक्त आनंदबाबांकडे कंबर दुखते म्हणून आले. डॉक्टरनी कमरेचा पट्टा दिला होता. आनंदबाबा श्री बाबांची उदी घेऊन कमरेला मसाज करीत असत. एके दिवशी समेळना क्रिकेटची मॅच खेळायची होती. आनंदबाबांकडे परवानगी मागितली. आनंदबाबांनी कमरेचा पट्टा आता टाकून दे व साईबाबांचे नाव घेऊन क्रिकेट खेळ, असा आदेश दिला. आश्चर्य असे की समेळ क्रिकेट

खेळले, काही प्रताप मॅचमध्ये गाजविला. नंतर दुसऱ्या दिवशी त्यांनी आनंद बाबांकडे आनंदाने गौरव रिपोर्ट दिला.

बाँबे ऑर्केस्ट्राचे मालक आनंद बाबांकडे आले. आनंदबाबांनी साईबाबांची उदी दिली. आशीर्वाद दिला. आनंदबाबामार्फत श्री साईबाबांची कृपा लाभली. त्यांचे प्रोग्राम यशस्वी झाले. हा सर्व प्रताप श्री साईबाबांच्या उदीचा आहे.

प. पू. आनंदबाबा सांगतात की शिव, विष्णू ही शिखर–सिंहासने आहेत आपल्या पुराणात इंद्राचा क्रमांक सांगितला जातो. याचा अर्थ इंद्र सिंहासनावर पवित्र विभूति कालांतराने विराजमान होते. व्यासांनी महाभारत लिहिले. विद्वान संशोधकांच्या मते व्यासांचे अथांग सागर-समान लिखाण अनेक व्यासांनी केले असावे. शंकराचार्यांच्या पीठावर जी विभूति विराजमान होते ती शंकराचार्य गणली जाते. जगाच्या दृष्टीने ही पीठे असतात. हा वस्तुवाद झाला. अध्यात्मातही अशी पीठे आहेत ती शिखर सिंहासने आहेत. शिव, विष्णू, ब्रम्ह वगैरे. महानता पावलेले आत्मे त्या शिखरावर विराजमान होतात. ह्या संकल्पनेनुसार श्री साई राम, किंवा काहींचा साई राम आनंदबाबांच्यामते विष्णूपदावर आज आहेत. श्री साईनाथ आता विष्णूपदावर विराजमान आहेत.

श्री साईबाबांची उदी तर चमत्कार करीत आहे. भक्तिभावे उदी धारण केली तर आपणास त्याचा परिणाम अनुभवण्यास मिळतो. ही उदी शिवभस्माची आठवण देते. त्याअर्थी श्री साईनाथ हे शिवपदावर विराजमान आहेत. आता गोंधळ होईल की श्री साई शिव–सिंहासनावर का विष्णू–सिंहासनावर आहेत. त्यावर एकच संकल्पना आहे ती म्हणजे श्री साईबाबा हे परमेश्वर आहेत. त्यांची उदी हा मानवाचा उदय आहे. त्यापेक्षा सर्वांना अभय असा आशीर्वाद आहे. आम्हा सर्व भक्तांना श्रीसाई हे साक्षात् परमेश्वर आहेत.

# शरणांगतांचा आधार—साईबाबा

—श्री. रमेश वसंत आबादे,
संत तुकाराम सोसायटी, संतनगर
पुणे—९

माझा जो जाहला काया वाचा मनी।
तयाचा मी ऋणी, सर्वकाळ ॥
शरण मज आला, आणि वाया गेला।
दाखवा, दाखवा, ऐसा कोणी ॥

● परमपूज्य महान सत्पुरुष श्री साईबाबा यांच्या उपरोक्त वचनांचा प्रत्यय असंख्य भक्तांना वारंवार येत आहे आणि या भक्तगणांची बाबांवरील श्रद्धा आणि निष्ठा जास्तच दृढमूल होत आहे.

सध्याच्या या विज्ञाननिष्ठ जगात चमत्काराशिवाय श्रद्धा आणि श्रद्धेशिवाय नमस्कारही नसतो. श्रीसाईबाबांसारखे अवतारी सत्पुरुष अशा चमत्कारांचे माध्यमातूनच आपले महात्म्य, अवतारीत्व जगास जाणवून देतात. आपण मनापासून, तळमळीने हाक मारली की भक्तांचे गाऱ्हाणे दूर करण्यासाठी श्री साईनाथ तातडीने धाव घेतात हा तर आपला सर्वांचा अनुभव असतो.

असाच मला नुकताच आलेला अनुभव पुढे सांगत आहे. या अनुभवामुळेच साईबाबांविषयी असलेला आदर, निष्ठा आणखीच वृद्धिंगत झाली.

परवाच्याच मार्च महिन्याची गोष्ट. माझी सव्वा दोन वर्षांची छोकरी कपिला एका सोमवारी अचानक आजारी झाली. तिला संध्याकाळी ७ नंतर ताप भरला आणि ती मलूल झाली. ताप वाढू लागला आणि १० वाजेपर्यंत एकदम तो १०४ डिग्रीपर्यंत गेला. आम्ही सगळेच घाबरलो. तापाच्या ग्लानीत ती काहीतरी असंबद्ध बडबड करू लागली. ते पाहून तर मी मनातल्या मनात देवाचा धावाच सुरू केला. कोणासही काहीच सुचेना. रात्र बरीच झाली होती तरी घरातले सगळेच जागत बसले.

ताप उतरावा म्हणून पुष्कळ प्रयत्न झाले. पट्ट्या ठेवून झाल्या. घरात तापाची गोळी होती तीही घातली. इतर काही प्रयत्न झाले, पण ताप कमी होईना. मी थोडा

अंगारा हातात घेऊन बाबांचे नाव घेऊन तो तिच्या कपाळी लावला. शेवटी पहाटे अडीच तीन वाजता घरातल्या एका पातळ औषधाने ताप पुष्कळसा उतरला.

इतकी हसरी खेळती मुलगी, सर्वांनाच आपल्या बाललीलांनी, हुषारीने, बोलण्याने वेड लावणारी त्या तापाने कोमेजून गेली. दुसऱ्या दिवशी सकाळीच आमच्या फॅमिली डॉक्टरांकडे घेऊन गेलो. त्यांनी अगदी काळजीपूर्वक तपासले, इंजेक्शन औषध दिले. पण पुन्हा दुसऱ्याही रात्री पहिलाच प्रकार! ताप चढला. पुन्हा पहाटेसच उतरला. दिवसभर तिचे अंग कोमट असे पण संध्याकाळ झाली की ताप चढायला सुरुवात.

डॉक्टरसुद्धा आपले सगळे कौशल्य पणाला लावून रोज निराळी औषधयोजना करू लागले. दोन दिवसानंतर तिला पाणी सुद्धा पचेना. दुधाची किंवा अन्नाची गोष्ट तर लांबच. थोडेसे पाणी घातले तर ते लगेच उलटून पडे. घरातले सगळेजण अगदी चिंतातूर होऊन गेले. पाच सहा दिवस झाले. डॉक्टरांनासुद्धा हे नेमके काय आहे ते उलगडेना.

मला शेवटी हा सगळा प्रकार असह्य झाला. मी ठरवले की, आता श्रीसाईबाबांनाच शरण जावे. आता तेच आमचे डॉक्टर. तारोत अगर मारोत. शनिवारी तशा निर्धारानेच पण अस्वस्थ मनाने ऑफिसला गेलो. सही केली आणि लगेच जवळच असलेल्या श्री. रासने यांच्या श्री साईबाबा मंदिरात गेलो. तेथे श्री बाबांच्या पायावर मस्तक टेकविले आणि अंतःकरणपूर्वक प्रार्थना केली. 'बाबा तुम्हीच दयेचे सागर आहात. माझ्या मुलीवर दया करा आणि तिला या विचित्र आजारातून लवकर बरे करा. ३ दिवसात ती पूर्ववत हसू खेळू लागली पाहिजे. मी स्वतः तिला शिर्डीला घेऊन येईन आणि तुमचे पायावर घालीन.' अशी मनोमन प्रार्थना केली आणि बाबांकडे वर पाहिले. त्यांचा अभय देणारा हात आणि नजरेतील प्रेमळ भाव पाहून काहीसे शांत वाटले. मंदिरातून थोडा अंगारा ( उदी ) घेऊन गेलो.

दुपारी घरी गेल्यावर मुलीच्या कपाळास उदी लावली. ही प्रार्थनेची गोष्ट मी माझे पत्नीशिवाय कोणास बोललो नाही.

श्री बाबांनी माझी प्रार्थना ऐकली, आणि खरोखरच २–३ दिवसात मुलगी पूर्वीसारखी हसू खेळू लागली. ती जणू काही आजारी पडलीच नव्हती अशा स्थितीत दिसू लागली. घरातील सगळ्यांचेच जीव थोडे भांड्यात पडले. यापुढची महान आश्चर्याची गोष्ट म्हणजे आमचा शिर्डीला जाण्याचा योगही पुढच्या आठच दिवसात आला. ( बाबांनीच तो आणवला )

मी यापूर्वी कधीच शिर्डीला गेलो नव्हतो. पूर्वी २/३ वेळा ठरवूनही रद्द करावे लागले होते, पण आता नेमकी माझ्या वडिलांच्या ऑफिसमधल्या काही लोकांनी ऑफिसच्याच बसने शिर्डी ट्रीप ठरवली. २१ मार्च रोजी शिर्डी–साकुरी येथे ट्रीप ठरली आणि वडिलांनीही लगेच तीन सीटस रिझर्व करून टाकल्या. मी संध्याकाळी ऑफिसातून घरी पोचल्यावर पत्नीने मला बातमी दिली की, 'आज दादांनी शिर्डी ट्रीपला जाणेसाठी तिघांचे पैसे भरले.' मी अत्यंत हर्षित झालो. दर्शन देण्याची बाबांचीच इच्छा होती असेच मला वाटू लागले.

ठरल्याप्रमाणे २१ तारखेस अगदी लवकर उठून मी आई, वडिल आणि मुलगी कल्पिता यांसह श्रीबाबांच्या दर्शनासाठी अपार औत्सुक्याने शिर्डीस निघालो. बरोबर दुपारी १२॥ वा. शिर्डी येथे बस पोहोचली आणि आरतीचे स्वर कानी आले. तावड तोब दर्शनासाठी जाऊन रांगेत उभे राहिलो. गर्दी थोडी होतीच पण दर्शन लवकरच मिळाले. मी एक मोठा हार श्री साईनाथांचे गळयात घातला. मुलीलाही बाबांच्या पायावर घातले. डोळे भरून बाबांचे दर्शन घेताना मन सारखे गहिवरत होते.

खरेच! माझ्या साईबाबांनी माझी प्रार्थना किती लवकर ऐकली होती. मनापासून केलेली प्रार्थना बाबांना किती तत्काल पोचते याची प्रचीति दिल्याबद्दल मी पुन्हा पुन्हा त्यांचेसमोर नतमस्तक झालो. नंतर मग आम्ही सर्वांनी इतर ठिकाणेही पाहिली.

अशा रीतीने श्री बाबांच्या कृपेनेच, त्यांच्या उदीनेच, माझ्या मुलीला लवकर बरे वाटले आणि आपल्या दर्शनाचा योगही बाबांनीच आणला. बाबा! खरोखर तुमची लीला अगाध आहे. तुम्ही शरणागताचे आधार आहात. तुमच्या कृपेचा वर्षाव तुमच्या भक्तांवर अखंड होत रहावा हीच तुमचे चरणी प्रार्थना आहे!

ॐ श्री साईनाथाय नमः।

Copy of Govt. Notification, due to which the Sansthan has been exempted from Income Tax. The donors also can take advantage of this exemption.

To be published in Part II Section 3(ii) of the The Gazette of India

# GOVERNMENT OF INDIA
# MINISTRY OF FINANCE
# (DEPARTMENT OF REVENUE)

**(MILAP JAIN)**

New Delhi : Dated the 16th December 1982.

## NOTIFICATION

(Income-Tax)

No. 5028 (F. No. 197/209/81-IT (AI) : In exercise of the powers conferred by clause (v) of sub-section (23C) of Section 10 of the Income-tax Act, 1961 (43 of 1961), the Central Government hereby notifies "Shri Sai Baba Sansthan Shirdi" for the purpose of the said section for the Period covered by the assessment years 1980-81 to 1982-83.

(MILAP JAIN)

Under Secretary to the Government of India

To,

The Manager,

Government of India Press,

Ring Road, Mayapuri Industrial Area,

(Near Rajouri Garden), New Delhi.

# उदीचा ताजा अनुभव

—श्री. सूर्यकांत दळवी
साई-कृपा निवास १९८/५४५२
पंतनगर, घाटकोपर

● गुरुपौर्णिमेचा दिवस होता. मंगळवार ता. ६-७-८२ रोजी मी कुर्ला मंदिर येथून गुरु पूजा करून घरी आलो. माझी मुलगी कु. संगिता हिला शौचामधून रक्त पडत आहे अशी सौ. सुशिला माझी पत्नी म्हणाली. मी तिला आल्याबरोबर उत्तर दिले. श्री साईबाबा आपल्या घरी बसले असता घाबरण्याचे कारण नाही. रात्री झोपतेवेळी माझ्या जवळ असलेली बाबांची उदी पाण्यातून पाजली व थोडी पोटावर हाताने लावली व घरातील साईबाबांच्या फोटोला नमस्कार करून म्हणालो, आदी शक्ती श्री साईबाबा मुलगी सकाळी झोपून उठल्यावर रक्त शौचामधून न पडता नेहमी प्रमाणे संडास होऊ दे. माझी विनंती बाबांनी गुरुपौर्णिमेच्या दिवशी ऐकली. मुलगी नेहमीप्रमाणे सकाळी उठून तिला. केव्हा पासून रक्त पडते विचारले असता दोन दिवस झाले. असे म्हणाली. माझी मुलगी संगिता ११ वर्षे वयाची आहे. दुसऱ्या दिवशी डॉक्टरना दाखविले डॉक्टर म्हणाले मुलीची तब्बेत एकदम ठीक आहे. असे बरेच अनुभव उदीचे आम्हाला आले आहेत आम्हा सर्वांवर बाबांची सदैव कृपादृष्टी असो, हिच श्रीबाबांपुढे त्रिकाल प्रार्थना.

☆

---

## नांदा सौख्यभरे

● ग्वाल्हेरचे साईभक्त श्री. दिनकररावजी सपकाळ यांची कनिष्ठ कन्या चि. सौ. कां. ममता हिचा विवाह मुंबईचे श्री. राजेंद्र कुमार कडवे यांचे बरोबर १७-२-८३ रोजी आर्य समाज मंदिर हॉल, नयाबाजार लष्कर येथे थाटाने साजरा झाला. वधू वरांचे हार्दीक अभिनंदन.

---

# ' मी पुन्हा प्रगट होत आहे ! '

**' शिरडीचे श्रीसाईबाबा ' नाटकाच्या यशस्वी निर्मिती नंतर**
**श्रीसाईबाबांचे गुरुबंधू–गजानन महाराजांचे प्रत्यक्ष दर्शन**

☆ मार्च अखेरीस रंगभूमीवर ☆

श्री गजानन महाराज संस्थान च्या सौजन्याने
**श्री गजानन महाराजांचे**
**तेजस्वी जीवन रंगभूमीवर** कुमारसेन गुप्ते
साईभक्तांसह सादर करीत आहेत
आरती थिएटर्स (मुंबई) निर्मित

# शेगावचे गजानन महाराज



लेखक : मधुसूदन जोशी • दिग्द : दीनानाथ लाड
निर्माता / संगीत : कुमारसेन गुप्ते

**४० कलाकारांसह गजानन महाराजांच्या भूमिकेत !**

**• गजानन महाराजांच्या भक्तांनी संपर्क साधावा •**

संपर्क : कुमारसेन गुप्ते १४ पितांबर लेन, माहीम, मुंबई १६ फोन–४५६५४१

# श्री साईकृपा

–सौ. पुष्पा य. काशीकर
२९, तेलीपाडा, भिवंडी

● माझी मोठी मुलगी बाळंतपणासाठी माहेरी आली होती. साईकृपेने ती १६ ऑगस्टला सुखरूप बाळंत होऊन तिला मुलगा झाला. परंतु एक महिन्यानंतर अचानक लिव्हरला सूज येऊन तिला थंडी ताप भरला. उलट्या सुरू झाल्या. डॉक्टरांनी तावडतोब ऑपरेशनसाठी तिला हॉस्पीटलमध्ये ॲडमीट करून घेतले.

आम्ही सर्वच काळजीत पडलो. ऑपरेशन टळावे म्हणून मी साईबाबांच्या फोटोपाशी धाव घेतली. साईबाबांवर माझी भक्ति होती. त्यांची प्रार्थना करून मुलीच्या पोटाला उदीचा लेप लावला. २–३ वेळा असे केले. ऑपरेशनपूर्वी तिला तपासताना डॉक्टर स्वतः आश्चर्यचकित झाले आणि म्हणाले, 'हा एक चमत्कारच वाटतो.' ऑपरेशन करावयास आता लागणारच नाही. मी मनोमन समजले. माझी हाक साईकृपेने ऐकली होती, व हे संकट टळले होते. मुलीची पोटदुखीही थांबली होती.

माझ्या मुलीचे ऑपरेशन टळले तर मी हा अनुभव साईलीलेत देईन असा नवस मी बोलले होते. तो आज पूर्ण करीत आहे.

श्री सांईकृपेने त्या काळात आलेली अशी अनेक संकटे निवारण झाली आहेत. आज या गोष्टीला एक वर्ष झाले आहे. दिरंगाईबद्दल मनोमन साईमाऊलीची माफी मागून. त्यांची अशीच तुम्हा आम्हावर कृपा राहो हो प्रार्थना करते.

तुझे चरण वंदिते श्रीसाईबाबा.

★

# मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी दरवर्षी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर लायन्स क्लब मुंबई आणि अहमदनगर जिल्हा परिषद यांच्या सहकार्याने आयोजित करीत आहे. यंदाचे पाचवे शिबीर दि. ७–१–८३ ते १६–१–८३ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आले. मा. सिटी सिव्हील कोर्टाचे न्यायाधिष मा. मारखीजानी साहेब यांच्या शुभहस्ते श्री. साईपूजन करून शिबीराचे उद्‌घाटन दि. ८–१–८३ रोजी सकाळी ९ वाजता झाले.

खालील प्रमाणे रुग्णांनी या शिबीराचा फायदा घेतला.

१) एकूण रुग्ण तपासणी. ८५०

२) एकूण झालेल्या शस्त्रक्रिया.

| | |
|---|---|
| १) पुरुष | २५६ |
| २) स्त्रीया | २१४ |
| | ४७० |

या शिबीरासाठी मुम्बईचे प्रख्यात नेत्रतज्ञ डॉ. तेलंग आणि डॉ. शिवलकर यांच्या बरोबर डॉ. तळवळकर, डॉ. बिजूर, डॉ. सानीकोप, डॉ. राव हे शिबीरासाठी आले होते. आमच्या श्रीसाईनाथ हॉस्पिटलचे नेत्रतज्ञ डॉ. पी. व्ही. आपटे, डॉ. प्रकाश काकरिया आणि अहमदनगर सिव्हील हॉस्पिटलचे डॉ. शिरगोपीकर आणि डॉ. जाधव यांनीही शस्त्रक्रियेसाठी आपला सहभाग दिला. या कामी श्रीसाईनाथ हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. देशपांडे पी एस. डॉ. एस. वाय. देशमुख यांना राहाता आरोग्य केंद्राचे डॉ. गुंजाळ व शिर्डीचे डॉ. नागरे व राहाता येथील डॉ. अंगाली यांनी सक्रिय मदत केली.

शिबीर व्यवस्थित व सुरळीत पार पाडण्यासाठी मा. कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरे साहेब आणि ॲड सुप. मा. पाठक साहेब यांचे कुशल आणि अनुभवी मार्गदर्शन लाभले. तसेच श्री साईबाबा संस्थानचे खाते प्रमुख श्री. ए. आर. शिंदे, श्री. जे. सी. मोदी, श्री. वी. बी. वाकलीवाल, श्री. आर. एन. कुलकर्णी, व्ही. एस. कुलकर्णी, इ. एन. कुलकर्णी आणि सर्व सेवकांनी परिश्रम घेतले. शिबीर नियोजनात श्री. मिराणे एस. आर. यांचाही सहभाग होता.

शिबीराच्या प्रचार कार्यासाठी शिरडीतील खालील संस्था व सद्गृहस्थांनी जाहीराती देऊन सहकार्य केले आहे.

१) सर्वश्री शामलालजी गंग्वाल, शिर्डी. २) विजय भिकचंद संकलेचा, शिर्डी, ३) सुहास मेडिकल स्टोअर्स, शिर्डी. ४) विजय मेडिकल स्टोअर्स, शिर्डी. ५) शाम अंबादास कुलकर्णी, शिर्डी. ६) साई संस्थान नोकरांची सहकारी पतपेढी लि. शिर्डी.



## नेत्र शिबीरातील एक दृश्य

प्रचारकार्यात आपल्या थिएटरमध्ये विनामूल्य स्लाईड दाखवून खालील लोकांनी सहकार्य केले.

१) श्रीकृष्ण टॉकीज, येवला, नासिक. २) गोपी टुरिंग टॉकीज, अकोला, अहमदनगर. ३) गजानन टुरिंग टॉकीज, शेवगाव, अहमदनगर. ४) न्यू महाराष्ट्र टॉकीज, नांदगाव, नासिक. ५) विरेश पिक्चर पॅलेस, राहाता, अहमदनगर ६) मा. दत्ताजी पाटील, माजी आमदार, लासलगांव, नासिक.

शिबीर काळात खालील मान्यवरांनी शिबीरास भेट देवून उपक्रमाबाबत समाधान व्यक्त केले.

१) मा. शिवाजीराव मोघे, बांधकाम राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई. २) मा. आमदार अण्णासाहेब म्हस्के. ३) मा. आर. एल. मीना, कलेक्टर, डांग अहवा, गुजरात. ४) मा. मंगलसिंगजी जाटव, आरोग्यमंत्री, मध्यप्रदेश.

५) मा. मातलवंडेसाहेब, जिल्हा आरोग्याधिकारी, अहमदनगर. ६) डॉ. राय प्रकाश शर्मा, अध्यक्ष नगरपालिका, शेवटा, म. प्र. ७) डॉ. हरवेन्द्रसिंह, कॉंग्रेस कार्यकर्ता, सलपिंपळ, म. प्र. ८) डॉ. जे. एस. गज्जर, डी. एच. ओ. डांग.

खालील साईभक्तांनी शिबीराला भेट देवून रुग्णांना बिस्कीटे दिली.

१) श्री. दासवानी, मुंबई. २) श्री. रमेशभाई मेहता, मुंबई. ३) श्री. शामलजी गंगवाळ, शिर्डी. ४) श्री. अशोकलालजी गंगवाळ, शिर्डी.

## पाचवे नेत्रशिबीर १९८३

| | | |
|---|---|---|
| १) एकूण तपासलेले पेशन्टस | | ८५० |
| २) झालेले ऑपरेशन्स | अ. पुरुष | २५६ |
| | ब. स्त्रिया | २१४ |
| | एकूण | ४७० |

३) तालुकावार पेशन्टस

१. अहमदनगर जिल्हा–

१. कोपरगाव २१३, २. संगमनेर ५८, ३. श्रीरामपूर ४९, ४. राहूरी २८, ५. नेवासा ९, ६. अकोला ३. ७. पाथर्डी ३, ८. नगर २, ९. शेवगाव २, १०. कर्जत १, एकूण ३६८.

२. नाशिक जिल्हा

१. सिन्नर ३४, २. निफाड १२, ३. येवला २०, ४. मालेगाव २, ५. नाशिक शहर २, ६. चांदवड १, ७. नांदगाव १, एकूण ७२.

३. औरंगाबाद जिल्हा

१. वैजापूर २७, २. गंगापूर १, एकूण २८.

| | |
|---|---|
| इतर ठिकाणाहून आलेले पेशन्टस | १२ |
| उजव्या डोळ्याचे ऑपरेशन्स | २५० |
| डाव्या डोळ्याचे ऑपरेशन्स | २१४ |
| मोतिबिंदू शिवाय इतर ऑपरेशन्स | ६ |
| एकूण | ४७० |

निडलिंग २, इन्ट्रोपीन १, सॅक १, टेरीजम ३, इनुकेलेशन १, आयरेक्टॉमी ४.

# उदीचा चमत्कार

—सौ. सुलभा गणेश प्रधान
वांद्रे ( पूर्व ) मुम्बई ४०० ०५१

● जून १९७६ ची गोष्ट आहे. माझी मुलगी कु. अपर्णा ही त्यावेळेस अवघी चार वर्षांची होती. तिला एक दिवस अचानक ताप भरला व तापाने ती नुसती फणफणली होती. परंतु तो दिवस रविवार असल्याने दवाखाने बंद होते. त्यामुळे तिला डॉक्टराकडे नेता आले नाही. शेवटी काही घरगुती उपायांनी तिच्या तापाची तीव्रता रात्री १० ते ११ पर्यंत कमी झाली होती. म्हणून आम्ही शांतपणे झोपी गेलो. रात्री २ वाजता मला जाग आली व बघते तर मुलीचे अंग थंडगार पडू लागल्याचे दिसून आले. मी माझ्या पतिराजांना उठविले तो पर्यंत मुलगी बेशुद्ध झाली होती. माझे पतिही साईभक्त असल्याने ते श्रीसाईंच्या प्रतिमेसमोर उभे राहिले आणि १०८ वेळा साईनामाचा जप त्यांनी केला व आरती म्हटली. नंतर हातात उदी घेऊन म्हणाले हे साईनाथा आपण भक्तांच्या संकटकाळी धावून जाता अशी आपली ख्याती आहे व जर ती ख्याती खरी असेल तर दहा मिनीटात माझ्या मुलीला बरे वाटले पाहिजे आणि काय चमत्कार झाला की उदी पोटात जाताच बरोबर दहा मिनीटात मुलगी सावध होऊन शुद्धीवर आली.

असा आहे बाबांच्या उदींचा चमत्कार.

---



## यंदाचा गोडखिंडी बक्षिस विजेता

**बक्षिस समारंभ**—सन १९८२ सालाकरिता उत्कृष्ठ स्वच्छता कामगार म्हणून ( सौ. सुशिलाबाई शंकरराव गोडखिंडी पारितोषीक चांदीचे पदक ) श्री. गोरखनाथ माधवराव गायके स्वच्छता कामगार श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी यांना मा. श्री. काकरे साहेब यांचे शुभहस्ते देणेत आले.

# पूजा साई चरण होईल दुःख हरण

—सुशिलाबाई बा. निंबाळकर
मु. पो. कलनाकवाडी ता. भूदरगड
जि. कोल्हापूर ४१६ २०९

● मानवी जीवनात माणसाला अनेक अडचणी येतात आणि आपली निष्ठा ज्याच्यावर आहे त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवून आपण आपले कार्य करीत राहिल्यास या अडचणीतून आपण सुखरूप निभावलो याचे अनुभवही येतात. मी एक साई-बाबांची भक्त आहे त्यांचेवर माझी अत्यंत निष्ठा आहे जीवनात अत्यंत आनंदाच्या वेळीही मी बाबांनाच पूजते व भजते तसेच अडचणीच्या वेळी संकटाच्या वेळी मी त्यांचाच धावा करते त्यांना शरण जाते. बाबा मला माझ्या संकटातून मुक्त करतात आणि जीवनात कित्येकदा सात्विक आनंद देतात त्यातील दोन अनुभव इथे मी देत आहे.

पहिल्या भेटी पळाल्या गाठी माझ्या तान्हुल्यांच्या ॥

माझ्या मुलांच्या व मुलीच्या गळ्यास गाठी होत्या डॉक्टरांचे औषध वगैरे चालू होतेच आणि एके दिवशी शिरडी येथे श्री बाबांच्या दर्शनाला जाण्याचा योग आला मुलांना घेवून शिरडीस गेले श्री बाबांचे दर्शन घेतले व श्री द्वारकामाई येथील धुनी-तील 'बाबांची उदी' मुलांच्या गळ्याला लावली व त्या गाठी बऱ्या व्हाव्यात अशी बाबांच्या चरणी प्रार्थना केली आणि थोड्याच दिवसात त्या गाठी संपूर्ण बऱ्या झाल्या कोणालाच औषधाशिवाय फक्त बाबांच्या चरणी प्रेम व विश्वास हेच औषध उपयोगी पडले.

भजीता साई पळाला आजार साईच आम्हा केवळ आधार ॥

दरवर्षी प्रमाणे आम्ही जानेवारी १९८२ मध्ये श्रीसाई चरित्र सप्ताह साजरा करण्याचे ठरविले. त्या नुसार पहिल्या दिवशी श्रीसाई मूर्ति स्थापना करून अध्याय वाचनास सुरवात केली. अध्याय थोडा वाचून होतोय तोपर्यंत कोल्हापूरहून माझी भाचीस रक्त दाबाचा तीव्र झटका आल्याचा व त्यांना हॉस्पीटलमध्ये ॲडमीट केल्याचा निरोप घेवून एक मनुष्य आला मला खूप भिती वाटली. तिकडे जाणे भाग होते

तरी पण मी साई चरणी सर्व भार सोपवून माझ्या मुलाला व सूनेला श्री बाबांचा प्रसाद व उदी घेवून भाचीकडे पाठविले, व तीन दिवसात अध्याय वाचून संपवून समाधी पूजन करण्याचा संकल्प केला. त्याप्रमाणे रात्री वाचन वगैरे चालू ठेवले, पण तिसऱ्याच दिवशी खुद्द आजारी भाचीचाच निरोप आला की, 'माझी तब्येत आता खूप चांगली आहे. तुम्ही ठरविल्याप्रमाणे सात दिवस वाचन चालू ठेवा.' त्याप्रमाणे आम्ही सात दिवस वाचन चालू ठेविले व यथासांग समाप्ती केली व साईलीलेचा अनुभव घेतला.

वरील सर्व अनुभवाने मी एवढे सांगीन की तुम्ही साई सेवा करा व अडचणीचा सर्व भार त्यांचेवर टाका ते तुम्हाला त्यातून निश्चितच निभावून नेतील 'पूजा साई चरण होईल दुःख हरण' एवढे सांगून श्री बाबांच्या चरणी मनःपूर्वक साष्टांग दंडवत करीते. ☆

# प्रेमा नंदाच्या लहरीवर मन माझे झुले

माझे भाग्य उदया आले देखिता साईची पाऊले
जीवा शिवाचे मंगल मिलन आज मला घडले
दिव्यत्वाचे तेज झळकले मस्तक आपोआप नमले
प्रेमा नंदाच्या लहरीवर मन माझे झुले
उदीच्या प्रसादाने कितीक लोक हो तरले
काय सांगू उदीचे सामर्थ्य असे आगळे
उदी नव्हे ती संजीवनी आशिष तीत भरले
प्रेमा नंदाच्या लहरीवर मन माझे झुले
नयनाशी नयन भिडले साई विश्वरुप दिसले
माझे मला कळेना साईशी माझे नाते जडले
वाहता चरणकमलावर भावभक्तिची फुले
प्रेमा नंदाच्या लहरीवर मन माझे झुले

—श्री. रमाकांत पंडित
प्रभास्मृती, भाऊ दाजी रोड
माटुंगा, मुंबई ४०००१९

# जेथे जातो तेथे तू माझा सांगाती
# चालविशी हाती धरोनिया।

—सौ. मीनाक्षी राजुरकर
४६, नेताजी सुभाष मार्ग,
इंदूर ( म. प्र. )

● ही ओवी आमच्या बाबतीत अगदी खरीच झाली आहे.

प्रत्येक पावलावर बाबा आपल्याला मदत करत असतात असा अनुभव मला क्षणोक्षणी येत असतो. तेव्हा बाबांना आपण सुमनांजली वाहावी. ते नक्कीच स्वीकार करतील. पण ही वहाताना त्यात कोणती फुले गुंफावीत हाच प्रश्न पडतो.

सुमारे ७ वर्षापूर्वीची गोष्ट. माझा मोठा मुलगा चि. आनंद ३ वर्षांचा होता. त्याला वर्षातून एकदा किंवा दोनदा टॉइफाईड होत असे. जरा ताप आला की टाइफाईड व्हायचा मग उलटायचा. असाच एकदा टॉइफाईड उलटला होता. त्याची तब्येत जास्तच झाली होती. घरात मी व माझे पती आम्ही दोघेच. तो माझ्या मांडीवर झोपला होता. खूप थकुन गेल्याने मलाही थोडा झपका लागला. स्वप्नात बाबा आले. आजसुद्धा मला तो चेहरा, ते भगवे कपडे व तो आवाज आठवतो आहे. त्यांनी अलमारी उघडली व मला म्हणाले, 'तुझा मुलगा खूप आजारी आहे ना! याला हे तीर्थ देतो ते दे व ही उदी लाव.' सकाळचे ४ वाजले होते. माझी झोप खाडकन उघडली व वाटले असं बाबांनी का सांगितले? तेवढ्यात आनंदपण उठला व मला म्हणाला, 'मम्मी मला उठव व घेऊन चल.' तो माझ्या मांडीत झोपला होता त्या कारणाने माझ्या पायाला मुंग्या आल्या होत्या. मी म्हणाले, 'तू उठ तर खरा, मग मी घेवून चलते.' त्याने प्रयत्न केला पण त्याला उठताच येईना. तो म्हणाला, 'मम्मी तूच उठव. मला उठताच येत नाही.' असे म्हणून तो रडू लागला. माझे लक्ष त्याच्या पायाकडे गेले. मला स्वप्न आठवले. मी हात लावून बघितले तर कमरेखालून त्याचे पाय सुन्न पडले होते. मला खूपच रडू आले. माझे पतीही घाबरले स्वप्नातील बाबा समोर दिसले. त्यांनी दिलेला तीर्थ व अंगारा आठवला. उदी आणली. व भराभरा सर्व अंगाला लावली. पाण्यात घालून पण पाजली. (येथे एक सांगावेसे वाटते की मी लहानपणापासूनच श्री. पू. गजाननमहाराजांची व श्री बाबांची पोथी वाचत आहे.) आणि काय आश्चर्य! ८–९ वाजेपर्यंत त्याला बरे वाटले! तो हसू लागला. त्याला आम्ही डॉक्टरकडे नेले तर ते म्हणाले, 'ह्याला तर काहीही झालेले

नाही. तू उगाचच ह्याला आणले आहेस. चल उभा कर याला.' व तो छानपणे उभा राहिला. माझ्या डोळ्यात आनंदाश्रु उभे राहिले. डॉक्टरांना काय सांगणार की, तुमच्याहून ही एक मोठा डॉक्टर आहे. त्यांनीच याला अपाहिज होण्यापासून वाचवले.

ह्या प्रसंगावरून माझी अगदी ठाम समजूत आहे की, 'बाबा' नेहमीच आपल्या बरोबर असतात व तेच सर्व काही करून घेतात. बाबांच्या चरणी माझी हीच प्रार्थना आहे की आपणच आमच्याकडून आपणास जे हवे आणि जसे हवे तसे करवून घ्यावे. आपले कृपाछत्र सदैव आपल्या नातवांच्या व लेकजावयांच्या डोक्यावर असावे. बाबांना कोटी कोटी प्रणाम.

उठता बसता ध्यावे नाम
साईराम साईराम

★

# मला आलेला साई कृपेचा अनुभव

–सुजाता शामसुंदर पालकर
डहाणूकर वाडी, कांदिवली

● श्री साईबाबांची आमच्या घरावर पूर्वीपासून फार कृपा आहे. प्रत्येक संकटाच्या वेळी बाबा आमच्यासाठी धावून येतात.

गुरुवार ता. ५–११–८१ रोजी मला एकाएकी चक्कर येऊन फारच घुसमटल्यासारखे झाले. मी फार घाबरून गेले. आईने मला उदी खावयास दिली. तसेच सर्व उदी अंगाला लावण्यास सांगितले. नंतर मी उदी पाण्याबरोबर पोटात घेतली. मनातच बाबांचे नामस्मरण करीत होते. मी तेव्हा नवस केला, मला लवकर पूर्ण बरे वाटल्यावर मी माझा अनुभव 'साईलीला' मासिकात देईन. त्याप्रमाणे मला दुसऱ्याच दिवशी गुण आला. बाबांच्या उदीचे सामर्थ्य फार मोठे आहे. संकटकाळी बाबा आमच्यासाठी धावून येतात, याचा चांगला अनुभव मला आला.

श्री साईबाबांची कृपा आमच्या पाठीशी सदैव रहावी अशी मी त्यांच्या चरणी प्रार्थना करते.

# श्री साईकृपा

—सौ. सुशिला धोपेश्वरकर
११८७, सदाशिव पेठ, 'तुकाराम आश्रम'
पुणे ३०

* १४ सप्टेंबर, ८२ मंगळवार तो दिवस मला अजून आठवतोय. माझे यजमान दत्तात्रय धोपेश्वरकर सकाळी ८॥ वा. नेहमीप्रमाणे कामावर गेले. १०॥ चे सुमारास पोस्टात गेले. श्री साईबाबांना शिर्डीला मनिआर्डर करण्यासाठी म्हणून फॉर्म भरला आणि ११ रु. भरण्यासाठी खिशात हात घातला तोच चक्कर येऊन खाली कोसळले. ताबडतोब तेथे असलेल्या दोन इसमांनी त्यांना बाकावर झोपवले. त्यांच्या अंगाला घाम सुटला आणि रक्ताची एक उलटी झाली. १० मिनिटे बेशुद्ध झाले. थोड्या वेळाने शुद्धीवर आले व त्यांनी ११ रु. मनिऑर्डर करण्यासाठी दिले आणि त्या लोकांना माझ्या यजमानानी सांगितले की मला घरी घेऊन चला. आम्हाला घरी एका माणसाचा फोन आला की, 'श्री. धोपेश्वरकरांना चक्कर आली आहे. आम्ही त्यांना घरी घेऊन येतो.'

माझा भाचा डॉक्टर असल्या कारणाने त्यांना घरी आणले. घरी आणल्यावर त्यांना पाहिले आणि आम्हा सर्वांना शॉक बसला. त्यांच्या सर्व अंगाला आंघोळ केल्यासारखा घाम आला. नाडी थंड पडली. तसेच त्यांना आम्ही कोचावर झोपवले.

तेथे वरच भिंतीवर श्री साईबाबांची मोठी तसबीर आहे. त्या फोटोकडे पाहून मी बाबांना विनवले आणि म्हटले, 'बाबा तुम्ही आत्तापर्यंत आम्हाला सर्व संकटात पावत आलात. आता त्यांना तुम्ही बरे करा. मी स्वारगेटला येऊन तुमच्या दारावर पाच नारळांचे तोरण बांधीन.' असे म्हणून बाबांची उदी यांच्या सर्व अंगाला लावली तोंडात घातली आणि ताबडतोब गाडीत घालून त्यांना हॉस्पिटलमध्ये नेले. तेथे सर्व तपासणी झाली. डॉक्टरनी तपासले. हार्ट चांगले, ब्लडप्रेशर नॉर्मल, २ दिवस त्यांना इन्टेन्सिव्ह केअर युनिटमध्ये ठेवले. एक्स रे काढला. त्यामध्ये काही आले नाही. ४थ्या दिवशी पोटात नळी घालून तपासले तर हरभऱ्याच्या डाळीएवढा अल्सर सापडला. मग डॉक्टरनी सांगितले की ऑपरेशन वगैरे करायला नको. औषधाने बरे होईल. १० दिवस हॉस्पिटलमध्ये ठेवले होते. आता त्यांची प्रकृती एकदम उत्तम आहे. नोकरीवर जाऊ लागले. फक्त पथ्यपाणी व औषधे चालू आहेत. असे माझे बाबा माझ्या हाकेला धावले.

अशा माझ्या बाबांना शतशः कोटी कोटी प्रणाम !

# साईलीलेच्या संमेलनाला, चाललो आम्ही शिर्डीला !

[ श्री. अंबाडे यांनी संमेलन प्रसंगी केलेली व तिथेच वाचून दाखविलेली कविता ]

पार नाही ह्या आनंदाला ।
नव रसांच्या मेळयाला ॥
साईलीलेच्या संमेलनाला ।
चाललो आम्ही शिरडीला ॥१॥

स्थान भूषवी अध्यक्षतेचे ।
डॉ. कापडी कोल्हापूरचे ॥
संमेलनाचा रंग आगळा ।
चाललो आम्ही शिरडीला ॥२॥

शोभा आली संमेलनाला ।
सर्वत्र साईचा वास राहिला ॥
शब्द अपूरे वर्णनाला ।
चाललो आम्ही शिरडीला ॥३॥

निमित्त हे तर संमेलनाचे ।
अदृष्य रूपी कार्य साईचे ॥
भक्तासि हुकूम साईचा झाला ।
चाललो आम्ही शिरडीला ॥४॥

--श्री. मधुकर अंबाडे
अंबाडे हाऊस, दांडिया बाजार, बडोदा

# साई महिमा

साई तुमची मूर्ति प्यारी
साई तुमची लीला न्यारी
साई तुमची कीर्ति भारी
साई तुमची उदी तारी ॥ १ ॥
भक्त संकटी असता बाबा
धावत येती साई बाबा
उदी देउनी भक्ता सत्वर
संकट निर्मूल करीती बाबा ॥ २ ॥
घेता दर्शन बाबा तुमचे
भाग्य उजळते भक्त जनांचे
प्रसाद भक्षण करीता बाबा
दुःखही हारते सकल जनांचे ॥ ३ ॥
तव भक्तीची नितांत गोडी
सर्वांना कळली फार थोडी
तव भक्तांची रिघ लागली
दर्शन तुमचे घेण्या शिरडी ॥ ४ ॥
बाबा तुमचा भक्त मामुली
भक्ति करीतो वेडी वाकुडी
दर्शन देई तव बाबा आता
धन्य धन्य मी होईन शांता ॥ ५ ॥

—श्री. शांताराम ब्रीद
२६ नव योजना सदन
ताडदेव, मुंबई ३४

# साई

साई एकादाची आता दर्शन द्या हो
दास जाणोनीया चरणी ठाव द्याहो
जन्मा येवूनिया पापे बहू झाली
उदीस्पर्शताची सर्वनष्ट झाली
अशी शक्ती तुझ्या विभूतीची
मस्तकासी तीसी लावोनी धन्य झालो
साई एकदाची आता दर्शन द्याहो
दास जाणोनीया चरणी ठाव द्याहो
गावामध्ये तुझ्या आला होता रोग
गहूरुपे त्यासी दळीसी जात्यात
दळीलेला रोग करीसी सीमापार
अशी लीला तुझी असे चमत्कार
साई एकदाची आता दर्शन द्याहो
दास जाणोनीया चरणी ठाव द्याहो
देवापरी देवतुची तुची साईनाथ
मायबाप तूची झालासी भक्तांस
तुझे नामाचाची लागलासे छंद
नको कष्ट देवू आता या दासास
साई एकदाची आता दर्शन द्याहो
दास जाणोनीया चरणी ठाव द्याहो
नको मज स्वर्ग सुखे भोगण्यास
नको मज प्राशावया अमृताचा घोट
परी आस माझी पुरी करा एक
अंत माझा साईकरी तुझेची दारांत
साई एकदाची आता दर्शन द्याहो
दास जाणोनिया चरणी ठाव द्याहो

—श्री. शाम तेंडोलकर
यशश्री अपार्टमेंटस राममारुती
रोड, नौपाडा, ठाणे

# शरण तुला साईनाथा

तुच कर्ता आणि करविता
शरण तुला भगवंता मी रे शरण तुला साईनाथा

तुझ्या दर्शने शांती मिळते
स्मरणे तुझीया भव भय हरते
अखंड नामे संकट टळते
सुख-शांतीचा तू निर्माता
शरण तुला भगवंता, मी रे, शरण तुला साईनाथा

तुच अमुचा माय ताता
तुजविण आम्हा न दुजा त्राता
संकट काळी धाऊनी येशी
कळवळूनी तू साक्षाता साईनाथा
शरण तुला भगवंता मी रे शरण तुला साईनाथा

तुझ्या उदीने रोग-राई टळते
तिर्थ-प्रसादे पुण्य लाभते
भजनी तुझीया दुःखही हरते
कलीयुगी तू साक्षात देवता
शरण तुला भगवंता मी रे शरण तुला साईनाथा

तुच कर्ता आणि करविता
शरण तुला भगवंता मी रे शरण तुला साईनाथा

—सौ. विनीता अ. केंकरे
राजवाडा, म्हापसा गोवा

# उदी नोहे नुसते भस्म

उदी नोहे नुसते भस्म हे तर आहे संजीवन
भक्तजनों ! घ्या भाळी लाऊन ॥ धृ ॥
साईची ही योग परीक्षा
भक्तांना तर अद्भुत दीक्षा
नरदेहाची राख पहा भरा सांगे धुनी आवर्जून ॥१॥
मशिदीमधली साईमाया
मालिक-अल्लाची ही किमया
घडविते जनांना अमरपणाचे ज्योतिर्मय दर्शन ॥२॥
भवतापाचा एक उपाय
उदी ही करिते नित्य सहाय
काळमुखातून जगतो माणूस हे मृत्युंजय जीवन ॥३॥

—श्री. राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'
पाटकर वाडा, भगतसिंग पथडोंबिवली (पूर्व) ४२१२० जि. ठाणे

## श्री. वसंतराव सूर्यवंशी यांचे दुःखद निधन

श्री साईबाबा संस्थानचे पर्यवेक्षक श्री. वसंतराव वामनराव सूर्यवंशी यांचे शिरडी येथे दि. १४-२-१९८३ रोजी अल्पशा आजाराने अवघ्या ३५ व्या वर्षी आकस्मित निधन झाले.

कै. वसंतराव सूर्यवंशी महसूल खात्याचे निवृत्त मंडल अधिकारी श्री. वामनराव सूर्यवंशी यांचे जेष्ठ पुत्र होते. ते कमाशाखेचे पदवीधर होते. त्यांनी संस्थान सेवेत सन-१९६९ मध्ये प्रवेश केला आणि आपल्या गुणांनी व त्यांनी निष्ठेने केलेल्या श्री साई सेवेचे फळ म्हणून पर्यवेक्षक या पदापर्यंत त्यांना पदोन्नती देण्यात आली होती.

ते अत्यंत कुशाग्र बुद्धीचे, निर्व्यसनी, तडफदार व मनमिळावू स्वभावाचे होते व त्यामुळे संस्थान अधिकारी व सर्व सेवक यांच्यात प्रिय होते.

त्यांच्या अकाली निधनाने सर्व संस्थान सेवक व अधिकारी यांना तीव्र दुःख झाले.

त्यांच्या मागे आई, वडील, ३ भाऊ, बहिण, पत्नी आणि एक मुलगा व दोन मुली असा परिवार आहे.

श्री साईबाबा त्यांच्या आत्म्यास शांति व सद्‌गति देवोत.

# साईंची उदी जशी ही पुण्याईची नदी

उदी लाविता भाळावरती
सर्व संकटे संपुन जाती
दुर्दैवाचे दिवस संपती
ये भाग्याची सदी
जशी ही पुण्याईची नदी ॥१॥

जळी मिसळुनी उदी प्राशिता
देहच होतो निर्मळ सरिता
व्यथा व्याधिही वितळुनी जाती
दुःख न स्पर्शी कधी
जशी ही पुण्याईची नदी ॥२॥

उदी उतरिता अंगावरूनी
पिशाच्च-बाधा जाते सरुनी
ज्ञानाई हा साई माझा
ठेवावा नित हृदी
जशी ही पुण्याईची नदी ॥३॥

—श्री. शांताराम नांदगावकर
' प्रशांत ' १९ ब, २० वा रस्ता,
खार ( पश्चिम ), मुम्बई–४०० ०५२

# विष्णू वासुदेव प्रभू साईचरणी विलीन



साईभक्त श्री. विष्णू वासुदेव प्रभु ह्यांचे दिनांक २–२–८३ रोजी रात्रौ ८ वाजून ५ मिनिटांनी हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ६५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुलगे १ मुलगी, सुन व एक नातु असा परिवार आहे. गेली ३० वर्षे ते नित्यनेमाने साईबाबांच्या तिन्ही उत्सवास सहकुटुंब हजर राहत होते. बाबांवर त्यांची नितांत श्रद्धा होती. ता. २८।१२।८२ रोजी त्यांना हृदयविकाराचा पहिला झटका आला. तेव्हा त्यांना राजावाडी हॉस्पिटलमध्ये २१ दिवस ठेवण्यात आले होते. नंतर बरे होऊन ते १८।१।८३ रोजी आपल्या घरी आले. त्यानंतर त्यांची प्रकृति सुधारत होती. पण २।२।८३ रोजी रात्री अचानक त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सर्व साईभक्त सहभागी आहोत. श्रीसाई त्यांच्या आत्म्यास शांती देवोत.

# साई संदेश

श्रीसाई प्रचार कार्यासाठी मराठी हिंदी विभाग मासिक
दरमहा एक तारखेस प्रकाशन

## साइ संदेश ( मराठी–हिंदी विभाग )

संपादक : **अशोक खांबेकर**, साईकृपा मुद्रणालय
कोपरगाव ४२३६०१ जिल्हा अहमदनगर
फोन नं. ४९६

* श्रीसाई प्रचार कार्यासाठी वाहिलेले संशोधनपर मासिकाचा प्रथमांक प्रकाशित झाला आहे.

* आकर्षक मांडणी दुर्मिळ माहिती व छायाचित्रे श्रीसाईंचे देखणे, रंगीत मुखपृष्ठ समकालीन संतावर प्रकाशित झोत. वाचनीय लेख विचारपुर्ण, आठवणी अनुभव शिर्डीवृत्त विशेष आदि मजकूरांनी नटलेले हे मासिक आहे.

* वार्षिक वर्गणी रु. ४०/– ( टपालखर्चासह व २ खास अंकासह )

* श्रीसाईलीला मासिकाचे जे वर्गणीदार आहेत किंवा साईभक्तांनी रु. ३=०० ( तीन ) रुपयांची पोस्ट तिकीटे पाठविल्यास नमूना अंक पाठविण्यात येईल.

* श्रीसाई भक्तांच्या नावाची सूची 'श्रीसाईसंदेश' पुस्तिका रुपाने प्रकाशित करीत आहे. कृपया संपूर्ण पत्त्यासह माहिती पाठवावी ही विनंती.

# ❋ घोषणा ❋

श्री साईलीला मासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीलाबद्दल दर वर्षी फेब्रुवारी नंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाची घोषणा.

| | |
|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थळ :- | साई निकेतन<br>८०४-बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुम्बई-४०० ०१४. |
| २. प्रकाशनाचा कालावधी :- | मासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव :- | श्री. पांडुरंग दाजिबा मोरे |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता :- | बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स, वडाळा,<br>मुम्बई-४००० ०३१. |
| ४. प्रकाशकाचे नाव :- | श्री. क. हि. काकरे |
| राष्ट्रीयत्व :- | भारतीय |
| पत्ता :- | साई निकेतन<br>८०४-बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुम्बई-४००० ०१४. |
| ५. संपादकाचे नाव :- | श्री. क. हि. काकरे |
| राष्ट्रीयत्व :- | भारतीय |
| पत्ता :- | साई निकेतन,<br>८०४ -बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुम्बई-४००० ०१४. |
| ६. हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागीदार यांची नावे व पत्ते. | श्री साईबाबा संस्थान, शिरडी<br>"( धार्मिक व चॅरिटेबल संस्था ) |

मी, श्री. क. हि. काकरे यानुसार असे घोषित करतो की वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

**क. हि. काकरे**<br>( प्रकाशकाची सही )<br>रिसीव्हर

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२=०० | ६=०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३=५० | ४=०० |
| ३) | ,, | हिंदी | १२=०० | ४=०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२=०० | ४=०० |
| ५) | ,, | कन्नड | १०=०० | ४=०० |
| ६) | ,, | तेलगू | १३=०० | ४=०० |
| ७) | ,, | तामीळ | १२=०० | ४=६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७=५० | ३=०० |
| ९) | ,, | हिंदी | ७=०० | ३=५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४=२५ | ३=०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४=०० | ३=०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०=३५ | ३=०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०=३० | ३=०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०=५० | ३=०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०=५० | ३=०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १=२५ | ३=०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (मराठी) | इंग्रजी | ५=०० | ३=०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०=७५ | ३=०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४=०० | ३=०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४=५० | ३=०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १=७५ | ३=०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १=७५ | ३=०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २६) | ,, | हिंदी | १=७५ | ३=०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

( कव्हर पृष्ठ ३ वरून )

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०=५० | ३=०० |
| १८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५=२५ | ३=०० |
| १९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १=५० | ३=०० |
| २०) | „ | मराठी | १=५० | ३=०० |
| २१) | शिरडी गाईड | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २२) | „ | हिंदी | छपाई चालू | आहे. |
| २३) | रुद्राध्याय | मराठी | ०=९० | ३=०० |

२४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०=०० प्रत्येकी प्रत १=००

( व्ही. पी. ची पद्धत नाही )

| अ.क्र. | फोटोचे नाव | फोटो साइज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १=६५ | ३=०० |
| २) | „ | १०"×१४ | १=१० | ३=०० |
| ३) | „ | ७"×१०' | ०=५५ | ३=०० |
| ४) | „ | ४"×५" | ०=२० | ३=०० |
| ५) | „ | २"×३" | ०=१५ | ३=०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा ( रंगीत ) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ७) | „ ( काळा पांढरा) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २=७५ | ३=०० |
| ९) | „ | १३"×१८" | १=०० | ३=०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा ( रंगीत फोटो ) | १०"×२० | १=१० | ३=०० |
| ११) | „ ( काळा पांढरा) | १०'×१४" | ०=८५ | ३=०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो „ | ९'×१२' | १=१० | ३=०० |
| १३) | „ ( रंगीत ) | ९"×१२' | १=६५ | ३=०० |
| १४) | निळा | ९×१३ | ०=७५ | ३=०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६=०० | ८=०० |

मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि., ४२, डी. [illegible] लिफर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकडे [illegible] निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लाट नं. ८०४ बी. [illegible] मुंबई १४